साप्ताहिक

# माणूस

२३ मार्च ८५/2 रुपये

## दुष्काळातून बाहेर ....




ग्रामायन विशेषांक

साप्ताहिक

# माणूस

वर्ष : चोविसावे

अंक : त्रेचाळिसावा

२३ मार्च १९८५

किंमत : दोन रुपये

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ व आतील चित्रे

राजू देशपांडे



## विकासासाठी.... आणखी काय ?

' गरीब देशांपैकी ज्यांनी यश मिळवले त्यांच्या यशाने हे सिद्ध केले की, प्रचंड धरणे, प्रचंड शेती, सर्वच मोठे, हा परंपरागत विचार साफ बिनबुडाचा आहे. नव्या शेतीक्रांतीचे वीर चीन व पंजाबमधील छोटया जमिनींचे मालक आहेत. इथिओपियातील भुकेलेल्यांचे सांगाडे जगातील दूरदर्शनाच्या पडद्यांवर झळकत आहेत. अशावेळी वाटते की उद्याचा इथिओपिया टाळायचा असेल तर या छोटया जमिनींच्या पराक्रमी मालकांची चित्रे दाखवायला हवीत. "


" गरीब देशांनी हे लक्षात घ्यावयास हवे की, लाखो व कोटी रुपयांची धरणे बांधण्यात किंवा हजारो एकरांची एकत्र शेती निर्माण करण्यात केलेली गुंतवणूक ही योग्य गुंतवणूक नाही. ग्रामीण रस्त्यावर केलेला खर्च, शाळा, पिण्याचे पाणी. यावर केलेला खर्च ही खरी योग्य गुंतवणूक आहे. कारण त्यामुळे तेथील वस्ती राहाते, वाढते, शेतकऱ्यांच्या मालाला गिऱ्हाईक निर्माण होते. " . . . .

' इकॉनॉमिस्ट ' या वजनदार ब्रिटिश वृत्तपत्राच्या दि. २ फेब्रुवारी १९८५ या अंकातील गाजलेल्या लेखातील ही अवतरणे आहेत. आपल्या नियोजनकारांची व परंपरागत अर्थशास्त्राची पोपटपंची करणाऱ्या विद्वानांची झोपच उडवून टाकणारी अशी अनेक अवतरणे या लेखात आहेत. या लेखाची ओळख १७ मार्च १९८४ या दिवशीच्या ' रविवार लोकसत्ता ' मध्ये संपादक माधव गडकरी यांनी करून दिलेली आहे.

पण समजा अशी विकेंद्रित पद्धतीने गुंतवणूक केली तरी काय प्रश्न निर्माण होतात ? अशी लक्षावधी व कोटयावधी रुपयांची गुंतवणूकही कशी मातीमोल होते, गावेच्या गावे कशी होरपळून व भाजून निघतात, असे होऊ द्यायचे नसेल तर अशा आर्थिक गुंतवणुकीबरोबरच आणखी काय करावे लागते याचा शोध घेणारी ही एक कहाणी आहे . . . .


पाणीपट्टी
कर्ज हप्ते
नोटीस
तारण
परवाना
पाणीपट्टी

# गोष्ट सांगवी-सांडसची



माणूस प्रतिनिधी

# मंगळवार, १८ डिसेंबर ८४

वाघोलीला एस. टी. गच्च भरली. आज मंगळवार. बाजारचा दिवस असल्याने बायकांचा भरणा अधिक झाला. गाडीत एक चमत्कारिक वास बाजारातल्या माल-मसाला कांद्याचा पसरला. वरती बायकांचा कलकलाट. मागच्या सीटवर जागेवरून वाचावाची चालू होती. पुढच्या बाजूला निवडणुकीच्या गप्पा रंगाला आल्या होत्या. शरद पवार आणि शंकर बाजीराव पाटील यांचे समर्थक मोकळेपणाने बोलत होते. निवडणुकीच्या मोसमातील रोज रंगणारी धुळवड ग्रामीण भागातल्या फुफाटयासारखी क्षणात आभाळात तर क्षणात जमिनीवर जागा सापडेल तिथं थंड होऊन पडणारी !

एस. टी. त पटकेवाले बरेच होते. काहींच्या डोक्यावर खास निवडणुकीच्या वाणाच्या टोप्या दिसत होत्या. वाघोली सोडली आणि कच्च्या रस्त्याला गाडी लागली. गाडीत साधारण मागच्या जागेवरच आम्ही असल्यामुळे एस. टी. थांबली की, भपकन धुरळा आत शिरे. प्रत्येक थांब्यावर हाच अनुभव. सुरुवातीला स्वच्छ रुमालाने तोंड पुसण्याचा प्रयत्न करीत असे; पण हे सारखंच करावं लागे. अखेर पांढऱ्या रंगाच्या रुमालाने आपले मूळ काम बदलून तोही आपल्या परीने धूळकाम करू लागला.

हरिभाऊ काहीशा गंमतीने म्हणाले, 'हे चालायचंच आता. साऱ्या रस्ताभर असाच फुफाटा !'

बोल्हाईपासून गाडी पुढे आली. हाताची घडी करून स्वस्थ बसून राहिलो. रस्त्याच्या कडेच्या झाडांवर-पानांवर लागूनच असलेल्या शेतातल्या ज्वारीच्या पिकांवर सर्वत्र धूळ उडून थर साचलेला दिसत होता. उतरेपर्यंत आपणही असेच धुळीने माखून जाऊ.

एका काटकोनातल्या वळणावर गाडी उभी राहिली. हरिभाऊ, मी आणि रविकांत उतरलो. गाडी पुढे राहूला गेली.

ज्वारीची शेतं, सर्वत्र धुळीनं भरलेला रस्ता. आमच्याबरोबर तीन-चार बायका पण उतरल्या. हरिभाऊंनी त्यातील एकीच्या हातातील जड पिशवी घेतली.

'इथून मैल दिडमैल असेल.' चालता-चालता हरिभाऊंनी अंतराची कल्पना दिली. खाली रस्त्याकडे पाहिलं. आता फुफाटा संपला होता. रस्त्यावर मोठी खडी पसरली होती. चालणं-एकूण त्रासाचंच होतं.

'रस्ता दुरुस्ती चाललीय वाटतं ?'


'छे...हे असंच रहाणार आहे. पिंपरीचा कॉन्ट्रॅक्टर आहे. त्याने अधिकाऱ्यांना शेजारच्या गावातून मधनंच आणून जेवढा अर्धा रस्ता पूर्ण झालाय तेवढाच दाखवला. काम पूर्ण झाल्याचं दाखवून त्यानं आपलं बीलही घेतलं. आता हा रस्ता पूर्ण झालाय असंच समजायचं !' हरिभाऊ म्हणाले. मी ऐकतच राहिलो.

'ह्ये असंच हाय बगा. अक्सी अंदमानच झालंय आमचं गाव' एकजण म्हणाला.

आता खडी चांगलीच टोचू लागली होती. हातातली बॅगही ओझं वाटू लागली होती. क्षणभर उसंत घेतली. समोर खडी पसरलेला रस्ता. वाटेत सावलीचं एकही झाड नाही. चार वाजून गेले होते तरी सूर्य अजून धगधगत होता. अंगावरच्या धुळीवरून घामाच्या धारा वाहू लागल्या.

सभोवार ज्वारीची शेतं पाण्याअभावी पिवळसर दिसत होती. मधूनच हिरवागार गहू-हरबरा दिसत होता.

एका ठिकाणी रस्त्याच्या कडेला शेतात खळं पडलं होतं. बाजरीची कणसं चार बैलांच्या पायाखाली तुडवली जात होती. खळ्याच्यामध्ये असणाऱ्या खांबाऐवजी शेतकऱ्याच्या कंबरेला पट्टा अडकवला होता. त्या पट्ट्याच्या एका टोकाला चार बैलांना अगदी जवळ वेसणीला खेटून बांधले होते. बरोबर मध्ये तो उभा राहून एका हाताने बैलांना हाकारत होता. हाकता हाकता बैलांबरोबर जागेवरच फिरत होता. दुसऱ्या हाताने एक खुरपं घेऊन मधूनच खालची बाजरीची कणसं सारखी करीत होता. चार खिल्लारं आणि तो शेतकरी गरगर एका तालात फिरत होते ! कणसातून भूस उडत होती आणि बाजरीचा दाणा वेगळा होत होता. जणू काही जमीन आणि आकाश यांना साधणारा तो गरगर स्वत:भोवती फिरणारा शेतकरी म्हणजे दांडाच आहे. आपल्या ताकतीवर त्यानं उभं आकाश तोललंय ! विलक्षण दृश्य होतं ते.



'लिफ्ट चालू हुतीया जुनू... !'

त्यानं वेग कमी करीत विचारलं आणि मी भानावर आलो.

'हो, लाईटची परवानगी मिळालीय. होईल एक-दोन दिवसात.' हरिभाऊ म्हणाले.

'थोडी खपली हाय. अर्ध्या वावरात ज्वारीचं समदं बाटुकच हुनार आता. आठ दिस आदी पयल मिळाय पायजे हुतं...' तो म्हणाला.

'आता असं आहे बघा दादा .. हे सरकारी काम. आज करतो म्हणाले तर उद्या होणार, उद्या करतो म्हणाले तर जात्यात आठ दिवस.' हरिभाऊ समजावणीच्या सुरात म्हणाले.

'त्ये बी खरंच हाय. आपल्या हातात काय फकस्त वाट बघणच आसतं...' त्यानं बैल हाकारले. त्याची बायको पोराला पाजीत पाठमोरी बसली होती ती आता पोराला सावलीला ठेवून त्याच्या मदतीला आली.

'हे असं आहे बघा, अजून पाणी मिळालं तरी आहे हे पिक दुप्पट होईल. अहो हीच बाटूक झालेली ज्वारी थोडी तरारेल आणि गुराना चारा तरी चांगला होईल. या ज्वारीला महिन्यापूर्वी पाणी मिळालं असतं तर चागली दहा पोती ज्वारी आली असती. पण केवळ कागदपत्रांच्या दिरंगाईत हा शेतकरी उपाशी रहाणार आहे जे पायलीभर बियाणं वापरलं त्याचाही खर्च निघणार नाही. शिवाय चार-सहा महिन्यातले श्रम वाया... रक्ताच झालेलं पाणी वाया...पुन: उपाशी रहायचं आहेच...आकाशाकडे पहात. आपल्याच नशिबाला दोष देत......' हरिभाऊ म्हणाले.

मी अस्वस्थपणे पाय रेटीत होतो.

केवळ दिरंगाई..

कागदाच्या लढाईत... !

शेतकऱ्याचे ससार उध्वस्त होताहेत.

पण इथं पर्वा आहे कुणाला ?

'ह्या किसन शहरात नोकरीला होता. वीस एकर जमीन आहे त्याची. लिफ्ट सुरू झाल्यावर चार एकर बागाईत करेल. दोन वर्ष केवळ लिफ्टच्या आशेवर उपाशीपोटी काम करतोय.'

मी मागे वळून पाहिलं. स्वत:च्याच नशिबाच्या खुटघाभोवती स्वत:ला बांधून गरगर फिरणारा किसन.

लिफ्टच्या आशेवर...

पाण्याच्या आशेवर...

आणि ही लिफ्ट अडकलीय भारताची दुर्दशा करणाऱ्या सरकारी दिरंगाईत... आळसात...भ्रष्टाचारात...

¤

कित्येक युगे ही भीमा वहातेय...चंद्रभागा वहातेय, पढरपूरच्या वाळवटाची आठवण देत वहातेय; पण गेल्या बारा पावसाळ्यानी, नव्हे उन्हाळ्यानी काय नाही पाहिलं... ? उन्हाळाच सर्वत्र ...! थेंब-थेंब पडणारा पाऊस. दिवसेंदिवस कमीकमी होत गेला. त्यानं दडी मारली...

पूर्वी खंडीखडीन धान्य निघे. दूधदुभतं भरपूर. साऱ्या पंचक्रोशीत गाव समृद्ध, आसपासच्या गावातनं मजूर मजुरीसाठी इथं यायचे. वाड्याचे उंबरठे झिजवायचे. तरुण मेहनत करायचे. जत्रेतून कुस्त्या खेळून गावाच नाव काढायचे. भजनीमडळं रंगायची. स्पर्धा व्हायच्या. बैलगाडीच्या शर्यतीतनं इथल्या बैलजोड्यांनी नबर पटकावायचे. इथले जवानगडी शरीरातली रग दाखविण्यासाठी हौसेनं बैलाच्या जागी स्वत:ला मोटेला जुपून विहिरीतून पाणी उपसायचे !

गावात कुणाकडेही लग्नाची बैठक असली की जाणती मडळी एकत्र बसत असत. बैठक गावच्या इतमामानेच चालत असे कुठं कुणाचं पैशावाचून अडलं तर पाहुण्यांना समजणार नाही अशा रीतीनं गावकरी जबाबदारी एकीनं उचलत असत गावची अब्रू ती आपली अब्रू समजून निर्णय घेत असत. गावच्या माहेरवाशीणीइतकीच सरबराई सासुरवाशीणीची असे सासुरवाशीणीला माहेरचीच वाट वाटावी इतका जिव्हाळा गावाच्या आयाबायाच्या मनात. सूनबाईनं उंबरठ्यात माप लवंडलं की आया-बाया-आषाढी-कार्तिकीला आळंदी-पंढरपूरला वारीत जायला मोकळ्या.

शेतात खळ पडलं, सुगी आली की, राखणीसाठी धावपळ. मग महिना-महिना काम चालायची. खळ्यातनं गाडीत, गाडीतनं घरात पोतो आपल्या पाठीवर सहजगत्या वाहून आणणाऱ्या आपल्या तरण्याबाड नवऱ्याकडं पाहून सासुरवाशीणी सुखावत असत. आयाबाया कानशीलावर कडाकडा बोटं मोडून पोरांना नजर लागू नये म्हणून बोल्हाईला नवस करीत असत.

गाव एका मस्त धुदीत झुलत असे. गावच्या या सुगीबरोबरच गावाला वेढून राहिलेल्या चिंचेच्या झाडावर विविध प्रकारचे पक्षी चिवचिवाट करीत गावाच्या समृद्धीच गुणगान आपल्या अनाहूत मधूर नादानं विश्वाला ऐकवित असत.

खळाळणारी अर्धचंद्राकृती भीमा क्षणकाल पढरपूरला विसरून पढरीचं मनोहारी रूप घेऊन उभ्या असलेल्या विष्णूच्या पुढे विसावत असे... !

हे चित्र दीडदोन तपापूर्वीच .. !

एकोणीसशे साठ-बासष्ठ पूर्वीच... !

¤

हळूहळू पाऊस कमी झाला. विहिरी आटल्या. उन्हाळ्यात प्यायच्या पाण्यासाठी नदीच्या विशाल कोरड्या पात्रात खड्डे खणून वाडग्याने पाणी भरून आणावे लागे. ज्या विष्णू डोहातले पाणी पूर्वी अथाग म्हणून समजले जाई, तो डबक्याप्रमाणे भासू लागला. गुरसुद्धा पाण्याला येणाऱ्या वासानं तोड लावेनाशी झाली डोळ्यात मावणार नाही इतकी प्रचड वाळू आणि उघडे-बोडके खडक सर्वत्र दिसू लागले आणि एक वर्ष पाऊस आलाच नाही. पेरलेल बी भेगाळलेल्या जमिनीत करपून गेल. जमिनीच्या पोटातील पाण्याचीसुद्धा वाफ होऊन भेगाळलेल्या जमिनीतून निघून गेलं. गावाचं अनाहतगीत गाणाऱ्या पाखरानी शेवटच्या शिटा टाकल्या आणि पाण्याच्या दिशेला गमन केलं. पंचक्रोशीतून कामधंद्यासाठी येणारी मडळी अन्यत्र कामधंद्यासाठी शहराकडे वळू लागली

बघता बघता गाव बदलू लागला. पावसानं पाठ फिरवली. तरी पिढ्यान पिढ्याची समृद्धी असणारी घरं गावात होती. त्यानं आलेली रग जात नव्हती. पाऊस नसल्याने शेती नाही. त्यामुळे मोकळा वेळ भरपूर. अशात एक दिवस गावात एकानं भट्टी लावली. रसायन तयार होऊ लागलं. गावातली जाणती मडळी चरकली.

पूर्वीही गाव पित होत, पण बाहेर कुठं तळेगावला बाजारला गेलं की आठवड्यातनं एकदा गाडीत धान्याच पोत घालायच ते बाजारात विकायच. मीठमसाला आणायचा, येताना थोडी मौज म्हणून दारू प्यायची,

पोरांसाठी गुडीशेव–चणे चुरमुरे आणायचे. नेणत्यांबरोबर जाणती मंडळी पण हेच करीत असत.

पण आता गावातच रसायन उकळू लागलं. दारातच मिळू लागल्यावर एक-एकजण सुरुवातीला नावं ठेवीत ठेवीत या नव्या शाळेत दाखल होऊ लागला आणि आठव-डयाच्या ऐवजी रोजचीज दारूची बैठक जमू लागली.

आणि या बरोबरच गावात स्पर्धा सुरू झाली. एका भट्टीबरोबर दुसरी आली. खाल्ल्या आळीला–वरल्या आळीला. मधल्या आळीला. सर्वांनी सर्वांची सोय पहायचं ठरवलं. प्यायला शुद्ध पाणी मिळायची मारामार तिथे पिर्पपिप दारू बनू लागली ! आसपासच्या गावातले टोळभैरव गावात जमू लागले. गावात चौकाचौकात छाती पुढे काढून, हाताची बोटे फाकून, गळयाच्या शिरा फुगवून एकएक शब्दावर जोर देत आई–भनिचा उद्धार होऊ लागला. दारूचे पेले रिचविण्याच्या स्पर्धेत घरांचे रस्ते चुकू लागले. आणि रस्त्यातच फुफाटयात लोक पडू लागले. दारू हेच भूषण झालं...

दुष्काळानं गावाची समृद्धी नेली आणि दारूनं अब्रू नेली. रोज गावात कलागती होऊ लागल्या. जे कधी घडत नव्हतं असं गावात घडू लागलं.

शहाण्या सुरत्यांनी नोकरी-धंद्याच्या निमित्ताने पुण्या-मुंबईची वाट धरली. ज्यांना ते जमलं नाही ते त्याच खाईत राहिले.

भक्तिरसानं न्हाऊन जाणारं, भजनाच्या टाळमृदुगानं दुमदुमणारं शंखचक्रगदापद्म विभूषित विष्णू मंदिर ओस पडलं. हळूहळू त्या मंदिराची होणारी डागडुजी बंद पडून आसपासच्या धर्मशाळेच्या ओवऱ्यांची लाकडे चोरीला जाऊ लागली. मेहनत बंद झाली.

सातवीपर्यंतची असलेली शाळा मुलां-अभावी बंद पडली. चौथीपर्यंत कशीबशी भरू लागली. शिक्षक टिकेनासे झाले. नर्स फिरकेनाशा झाल्या. पत्रंच जात येत नसल्या-मुळे पोस्टमन नियमितपणे येईनासा झाला. गावापर्यंत येत असणारी एस. टी. बंद झाली. मुक्कामाच्या एस. टी. तलं डिझेलच चोरीला जाऊ लागल्यावर एस. टी. खातं तरी काय करणार ...!

सुरुवाती सुरुवातीला कोंबडया चोरीला जात. नंतर शेळया जाऊ लागल्या. एकदा तर गोठयात बांधलेली बैलजोडी गावातल्याच दोघांनी चोरून नेऊन विकली ! गावातल्या कटकटींना पोलीस खातं कंटाळले, आस-पासच्या गावातले गावकरी वैतागले.

गाव दिवसेन दिवस बदलत होतं.

बिघडतच होतं.

## २० डिसेंबर

इथं येऊन दोन दिवस झाले. वरून सगळं गाव सुस्तावलेलं दिसतंय. एकेकाशी बोलताना गावाचा पूर्वेतिहास समजत होता.

सकाळी गावातनं फिरून विष्णू मंदिरा-जवळ आलो. जशी गावाची दशा तशीच मंदिराची. मध्ये विष्णू मंदिर. आतमध्ये गाभाऱ्यात भगवान विष्णूंची शंख, चक्र-गदा-पद्मविभूषित काळीभोर कोरीव मूर्ती. त्याला लाकडी मखर केलेलं खूप जुनाट. त्याच्या पायाशी लक्ष्मीची दोन हत्तींच्यामध्ये बसलेली संगमरवरी मूर्ती. मूर्तीकडे पहाताच मन प्रसन्न झालं. मंदिराच्या उजवीकडे उजव्या सोंडेच्या गणपतीचं देऊळ आणि डावीकडे महादेवाचं मंदिर. महादेवाच्या पिंडीच्या शाळुंकेभोवती नागाचं दगडी वेटोळं होतं. बाहेर नंदी होता लाल दगडातला. त्याला तोंड नव्हतं. एकेकाळी हे मंदिर खूप समृद्ध असले पाहिजे याची साक्ष सभोवताली पसरलेल्या भग्नावशेषांवरून येत होती.

देवळाच्या बाहेरच मंदिराचे पुजारी श्री. पिंगळेकाका भेटले. मी नमस्कार केला. रवी आदरकरही बरोबर होता.



पिंगळेकाका एका पायाने अधू दिसत होते. चालताना उजवा हात अधू पायाच्या गुडघ्यावर टेकवावा लागत असे. डोक्यावर लांब भरघोस पण अस्ताव्यस्त शेंडी. काळसर वर्ण. साधारण सत्तरीच्या आसपास वय.

त्याच्या आग्रहानं देवळाच्या मागेच असलेल्या त्यांच्या घरी निघालो. घराजवळ येताच ते म्हणाले,

'हे बघा प्रभुणे, आम्ही जुनी माणसं. श्रुती–स्मृती मानणारी. आता भोजनाची वेळ आहे. मध्यान्हीला येणाऱ्या अतिथीला तो कोण कुठला याचा विचार न करता जेवायला घालावे असं शास्त्र आहे. त्यामध्ये तीर्थयात्रा केल्याचं पुण्य लाभतं. तुम्ही आमच्याकडे जेवावत अशी इच्छा आहे.'

'जेवायला काहीच हरकत नाही. तुमचं पुण्य हिरावून घेण्यात काय मजा आहे? पण आम्ही जिथं उतरलोय तिथं कल्पना द्यायला हवी.'

आम्ही तशी कल्पना देऊन आलो. वाटेत आदरकर म्हणाला,

'कमाल आहे हं! काही ओळखदेख नसताना त्यानी जेवायला बोलावलं. खेड्यात भारतीय संस्कृतीचं दर्शन अजूनही घडतं.'

पिंगळेकाका गप्पिष्ट दिसले. त्यानी प्रथम प्रस्तावनेतच 'माणूस'ची कुंडली माडली. माणूसचे ते जुने वाचक. श्री. ग. माजगावकर हे संपादकाचं नाव स्मरणात ठेवलेले. 'माणूस' चे इतके जुने वाचक या आडगावात भेटतील असं वाटलं नव्हतं.

'आम्ही जुनी माणसं. आता तुम्ही आमचं गाव पाहिलत, ते कसं जुनाट जुनाट वाटलं. आमच्यासारखंच चिवट ते! बदललं नाही. लाईट सोडली तर दोनशे वर्षांपूर्वी सारखंच आहे. न सुधारलेलं. बापजाद्याचं भरपूर होतं म्हणून आमची पिढी राहिली. पूर्वी तर हे गाव म्हणजे अंदमानच! माझी मुलं शिकली. एक पुण्यात एक मुंबईत. एक इथच देवकर वाडीत सरपंच आहे.'

पिंगळेकाका बोलत होते. त्यांच्या बोलण्यात आवेश होता. पण सराव संपलेल्या पहेलवानासारखा!

पिंगळे मूळचे अंबाजोगाईचे. पेशव्यांचे तोफखान्याचे सरदार पानसे यांनी त्यांना आणलं. पिंगळे सांगत होते.

'पूर्वजांची पुण्याई किती दिवस पुरणार? पण सरदार पानशानी आमच्या पूर्वजाना इथं आणलं. हे गाव पानशाच्या इनामीचं. त्यांनी पाहिलं, पंढरपूरसारखी या गावाला भीमा चंद्रकोरीप्रमाणे वळसा घालून जातेय. भरपूर रूंद पात्र आहे. त्याच्या घराण्यातील एका विधवेला पंढरपूरला जाणे जमेना, म्हणून पानशांनी हे मंदिर उभारलं. घाट बांधले. पूर्वी हे गाव वरती होतं. मंदिर झाल्यावर गाव आत्ताच्या ठिकाणी आलं. पुण्यात शेवटच्या बाजीरावाच्या काळात चातुर्मासात जी दक्षिणा वाटली जायची त्यात तीन ओंघराळ्याचा मान आमच्या पूर्वजाना होता. लॉर्ड डलहौसीन पानशाचं दत्तकविधान नामजूर केलं आणि हे इनाम खालसा केलं. जमिनीवर कर आकारणी केली. देवस्थानला जी ५०० एकर जमीन होती ती पिंगळ्यानी सोडून दिली आणि पंचक्रोशीतल्या भिक्षुकीवर गुजराण करू लागले. आमचे वडील ब्रिटिशाच्या काळात डी. एस. पी. चे क्लार्क होते. क्रांतिवीर चापेकरांना येरवड्यात ठेवले–त्यावेळी ते तिथे होते. चापेकर त्याना म्हणाले, 'अरे तुम्ही हिंदू ना? मग सध्या नाही करू देत मला?' आणि आमच्या वडिलांनी धोका पत्करून त्याना सध्येचं साहित्य आणून दिलं. आमचे बाबाच ही आठवण पुढे सांगत असत.'

पिंगळ्याच्या चेहऱ्यावर अभिमान दिसला. पिंगळ्याच्या रहात्या दोन खोल्या सोडल्या तर संपूर्ण वाडा पडायलाच आलेला. उंदीरघुशीचं आगर. त्याच्या वाड्याशेजारी एका गढीवजा मोठ्या वाड्याचे अवशेष फक्त बाकी आहेत. त्या अवशेषांमध्ये एक मोठा दरवाजा आजही दिमाखाने ताठ उभा आहे. सर्वत्र गवत, माती, दगडाचे ढिगारे!

पिंगळेकाकांच्या दारात घोडा उभा होता. भिंतीवर चामड्याचं रिकीब ठेवलं होतं. एका पायान अधू असलेले पिंगळे आजही या वयात घोड्यावरून जाऊन भिक्षुकी करतात!

'अहो तुम्ही आता आलाच आहात. पहालच! गाव हे असं. अहो शाळा गावकऱ्यांनी बंद पाडली. विश्वास बसेल तुमचा? सुरुवातीला चौथीपर्यंत एक शिक्षकी शाळा होती. त्यानंतर सातवीपर्यंत शाळा झाली. सात शिक्षक आले, चागले तरुण. पुढाऱ्यांना वाटायचं शिक्षकांनी आपल्याला जेवायला खायला घालावं. शिक्षकांना हे नेहमी नेहमी आवडायचं नाही. मग पुढारी काहीना काही करून भांडण उकरून काढायचे. हा शिक्षक आमच्या मुलीना फितवतो! असे रिपोर्ट करून गावातून शिक्षक घालवून दिले. असं सारखंच व्हायला लागल्यावर इथं शिक्षकच कुणी येईना. शिक्षकानी बदल्या करून घेतल्या. काही दिवस शाळा बंदच होती. पुढे सुरू झाली; पण चवथीपर्यंतच. पाचवीला इथ इंग्रजी नाही म्हणून विठ्ठलवाडीला जायला लागली. मी मग काही काळ उरळीकांचनलाच होतो. माझ्या मुलाचं शिक्षण मणिभाईंनीच केलं. त्याचे मार्गदर्शन नसते तर आज या गावात राहून माझी वाताहतच झाली असती. मी असा हा पंगू.''

पिंगळेकाका सांगत होते. आम्ही जेवत होतो. जेवायला बसण्यापूर्वी त्यानी आम्हाला गंध लावून दक्षिणा ठेवली. आदरकरला हे सारं नवलाचं वाटत होतं.

पिंगळेकाकाच नव्हे पण या गावातली माणसं खूपच मोकळी वाटली. प्रत्येकजण आपल्या अतरंगातलं सांगत होता. अगदी मनातलं जाचणारं दुःख सुद्धा बोलून दाखवत होता!

'आमचं गाव कधी कुठल्या चळवळीत पडलं नाही. या गावातला कधी कुणी बाहेर गेला नाही. स्वातंत्र्य म्हणजे काय मिळालं आणि पारतंत्र्यात होतो म्हणजे काय होतो याचं इथल्या शेतकऱ्यांना काहीच सुखदुःख नव्हतं. राजकारणातल्या उलथा पालथीचा गावावर काही परिणाम झाला नाही. नाही म्हणायला या निवडणुकीत कधी नव्हे ते गाव काँग्रेसच्या उमेदवाराच्या विरोधात गेलंय. त्याचे कारणही वेगळं आहे. शंकर बाजीराव आम्हा लोकांना सोलापुरी वाणाचे वाटतात. शरद पवार अस्सल पुणेरी! जग कुठं चाललय हे आमच्या पिढीला कळलच नाही. काही मुलं बाहेर गेल्यावर सुधारणा पाहून त्याना वाटायला लागलं– आपण सुधारायला पाहिजे. पण हे गाव सुधारलं नाही. फक्त शेती केली. त्यात सुद्धा पाणी नसल्याने प्रगती नाही. मात्र टगेगिरीत हे गाव फार पुढे. या गावात कुणी माणसं टिकली नाहीत. ठकास महाठकच या गावात टिकले.'

पिंगळ्यांनी 'महाठक' या शब्दावर जोर दिला आणि आमच्याकडे पाहून मोठ्यानं हसले.

'आमची मुलं–सुनाना हे नकोस होतं. या गावातलं वातावरण आणि होणारे हाल पाहून ती मागे लागलीत, आता पुरे झालं गावावरच प्रेम. पण जीव तुटतो हो. वाटतं गाव बदलेल. काहीतरी निमित्त होईल आणि गाव बदलेल. आणि झालंयही तसच. तुमचं ते 'ग्रामायन' आल आणि वाटू लागल की आपण राहिल्याच काहीतरी चागल पहायला मिळणार.'

पिगळे काकांच्या वृद्ध चेहऱ्यावर एक कोवळीक दिसू लागली.

'ग्रामायनमुळे या गावात एक चैतन्य आलय आणि माझ्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहे. मग ते गावावरच कर्ज फिटायला दहा वर्ष लागोत, नाही तर पधरा वर्ष लागोत ! आपल्या दुर्दशेबद्दल गावकऱ्याना विचार करायला लावून, प्रयत्न केले तर बदल होऊ शकतो हे ग्रामायनने दाखवून दिलय या गावातल्या लोकाना हाताशी धरून सहकार्याने एखाद चागलं काम उभ राहू शकत हा चमत्कार ग्रामायनने फार थोड्या अवधीत केला आहे. काही गोष्टी अपरिहार्य असतात. धर्मात सुधारणा झाल्या विचार बदलले पण ज्यांना आपला विकास कशात आहे हेच समजले नाही ते काय करणार? इथला माणूस बदलवण्याचं महत्त्वाच काम व्हायला हव. असंच कुणी तरी निस्वार्थीपणे नेटानं काम करणार हवय. त्यात आता ही तरुण पोरं चागली आहेत. त्याच्याकडून काही चांगले बदल घडतील असं वाटतं.'

आमच भोजन आटपून आम्ही बाहेरच्या ओसरीवर आलो. बाहेर कुणी पचाग बघायला आले होते. कुणाच्या सुनेला दोन दिवसापासून बरं नाहीय, काय करावं, असं विचारत होती. एक दोघजण घराच्या पायाभरणीचा मुहूर्त पहायला आले होते. एकजण नुसतंच पानतंबाकू खायला आलेला !

'आपल्याजवळ जे जे आहे ते ते लोकाना देत राहिल की, लोकाच प्रेम-विश्वास मिळतो. अठ्ठेचाळीसच्या गाधीवधाच्या दंगलीत बाहेरच्या लोकांपासून गावकऱ्यानीच सरक्षण दिलं'– पिगळे.

पिगळेकाकांच्या गप्पातून गावाच अंतरंग उघड होत होतं. ग्रामायनने फार थोड्या कालावधीत इथल्या लोकाचा विश्वास संपादन केलाय.

इथं येण्यापूर्वी माणूस कार्यालयात श्री. ग. मा ना भेटलो होतो. ते म्हणाले होते–

'ग्रामायनला विविध जाती जमातीतला समाज एकात्म भावनेनं गुंफायचाय. हा दलित, हा मराठा, हा ब्राह्मण, हा शहरी, हा ग्रामीण असे कोणत्याच प्रकारचे भेद, जे आज सर्वत्र विविध सस्थाकडून दर्शविले जातात, अप्रत्यक्ष किंवा प्रत्यक्षरीत्या,ते सोडून, समाजात एकात्म भाव वाढवायचा. ग्रामपातळीवर ज्या अडचणी आहेत त्या अशा दृष्टिकोनातून दूर करायच्या. असा प्रयत्न ग्रामायनकडून आम्ही करतो'

त्याचे प्रत्यंतर इथं आल्यापासून घडत होतं.

---

## २१ डिसेंबर

---

पहाटे लवकरच जाग आली. कडाक्याच्या थंडीमुळे अंथरूणातून बाहेर पडणं नकोसं वाटत होतं. शाल पाघरून बाहेर आलो. आकाशात तुरळक चांदण्या शातपणे तेवत होत्या. पूर्व दिशेला किंचित चमक दिसू लागली होती. स्वच्छ सारवलेल्या अंगणात रागोळीची रेघ ओढावी तशी क्षितिजावर एक कुकवाची लाल रेघ दिसू लागली होती. हळूहळू पूर्वेनं आपलं अधोवदन काळधाभोर पहाट कुंतलातून वर केलं आणि सुस्नात कपाळावरील नुकत्याच लावलेल्या लालचुटुक कुंकवासारखी सूर्याची बिंदी हळूहळू वर येऊ लागली.

पक्षांचा चिवचिवाट धरणाच्या दिशेने येऊ लागला. पक्ष्यांच्या माळा एका लयीत आकाशात झेपावू लागल्या. पाढऱ्याशुभ्र बगळ्याच्या माळाच्या मागोमाग चिमण्याचे थवे एका दिशेकडून दुसऱ्या दिशेकडे उडत गेले. पोपटाचा एक थवा कलकलाट करीत विष्णूमदिराच्या जवळच्या चिंचेवर उतरला

घाटावर पाण्यासाठी जाणाऱ्याची गडबड सुरू झाली. एक दोन कावडी पाणी आणताना दिसल्या. गुराच्या गोठ्यातून गाईम्हशींच्या गळ्यातल्या घंटाचं घणघणणं कानावर पडू लागलं. दुधाच्या धारेचा चर्रर चर्रर आवाज कुठूनसा येत होता. शेणगोठा करताना होणारी बांगड्याची किणकिण, विष्णूमंदिरातून येणारा संथ लयीतला घटेचा नाद आणि बैलगाडी जुपून शेतावर जाणाऱ्या शेतकऱ्याची धांदल. बैलगाड्यांचं खड्खट खड्खट करीत ताल धरीत चालणं. मध्येच कुठून तरी येणारी जात्यावरची लकेर... मंजूळ नाद...!

इथल्या प्रत्येक कृतीत एक लय आहे. एक नाद आहे. एक मनाला प्रसन्न करून सोडणारा नैसर्गिक स्पर्श आहे !

मन प्रसन्न झालं. गावातल्या लोकांचा क्षणभर हेवा वाटला. रोज अशी प्रसन्न प्रभात असल्यावर काय कमी आहे ! मनात विचार आला आणि एक बैलगाडी समोर थाबली.

'राम राम...!' शातारामबुवा लोले गाडीतून म्हणाले.

'राम राम... ! गाडी घेऊन चाललाय म्हणजे ज्वारीच्या पोत्यांची थप्पी आणणार अस दिसतंय.' मी म्हणालो.

'कशाची थप्पी ? वाटुक झालंय समदं. त्ये आणायचं काढून आज. एक काळ हुता. खळ्यावरन घा हेलपाटं हुत हुतं गाडीचं, ज्वारीची थप्पी लागत हुती. पर मी ल्हान हुतो त्यावेळची गोष्ट झाली ही. आता कशाचं काय... समद वाटुकच हुतंय चार साल झाल.'

शातारामबुवांनी गाडी हाकली. माझं मन चरकल. प्रभातीच्या प्रसन्न चित्राला एक आरपार तडा गेला आणि त्या लयीत, त्या तालात, त्या नादात एक प्रकारची आर्तता जाणवू लागली.

तुडुब भरलेली भीमा शेजारी असूनही हे सागवी–सांडस गाव कोरडच राहिलं.

विकासाची योजना घेऊन आलेल घरण असूनही गाव दुष्काळीच राहिलं.

समृद्धीची गगा दारात उभी असूनही विष्णू मदिरातली पूजा साकारली गेली नाही.

एक आर्त अशी वेदना उरात बाळगून इथला प्रत्येकजण जगतोय...

असं का...

अस का...

### ह. ता. लि. इ. फेडरेशन

१९६६ चे डिसेंबरचे दिवस.

गारठवून सोडणारी थंडी.

पण गावाला उब देणारी एक घटना घडली !

प्रसिद्ध गांधीवादी कार्यकर्ते श्री. मणिभाई देसाई या सांगवी गावात आले. त्यांच्याबरोबर आमदार अण्णासाहेब मगर, उरुळीकांचनचे प्रगत शेतकरी दत्तोबा कांचन, किसन खादवे, मामासाहेब पिंपळे इ. हवेली तालुक्यातील थोर मंडळी आली.

गावाच्या विकासाची गुरुकिल्ली घेऊन !

शासनाच्या योजनाचा लाभ गरीब मागास गावाना-शेतकऱ्याना व्हावा, यासाठी या मंडळींनी हवेली तालुक्यातील वाहाणाऱ्या मुळा-मुठा-भीमा नद्यावरील बेचाळीस गावासाठी एक योजना आखली.

'हवेली तालुका लिफ्ट इरिगेशन फेडरेशन' या नावाने संस्था रजिस्टर झाली. या संस्थेमार्फत बेचाळीस गावांची पहाणी करून त्याना लिफ्टद्वारे शेतीला पाणी देऊन या गावाचा संपूर्ण कायापालट करायचा अशी ही योजना !

त्यासाठी मोठमोठे तज्ज्ञ नेमण्यात आले. त्यानी या गावाचा अभ्यास करून शासनाच्या धडकयोजनेत या योजनाना शासनाचे तगाई कर्ज मंजूर करून घेतले.

## सांगवी सांडस

हे त्यापैकी एक गाव.

म्हटलं तर भाग्यवान...!

कारण दुर्भाग्याशिवाय या गावावर आजवर कुणाचीच मेहेरनजर झालेली नव्हती !

नाही म्हणायला मणिभाईंनीच यापूर्वीच्या दुष्काळात एकदा गावाला सहकार्य दिले होते पण गावकीतल्या असहकाराने दारी चालत आलेल्या भाग्याचा सांगवीकराना लाभ घेता आला नाही. त्याचं असं झालं-

५२ साली असाच मोठा दुष्काळ पडला. मणिभाईंनी दोन ऑईल इंजिन्स सांगवीकराना दिली. सर्व शेतकऱ्यानी आळीपाळीने ती वापरायची होती. डिझेल आणि मेंटेनन्सचा खर्च सांगवीकरानी करायचा.

पण इंजिनाचा व्हावा तसा उपयोग झाला नाही. सांगवीकरांना करून घेता आला नाही. अखेर मणिभाईंनी ती दोन इंजिने दुसऱ्या गावाला दिली. गावकऱ्यांनीच तशी मागणी केली. ही इंजिने आम्हाला नकोत !

तर असे हे सांगवी सांडस.

स्वत:बद्दल कमालीचे उदासीन असलेले. पुन: एकदा मणिभाईंच्या नजरेखाली आले. सहासष्ट साली परिस्थितीत खूपच बदल झालेला. इतर गावांबरोबर आपलाही विकास होतोय. त्याकरिता आपल्याला फार कष्ट घ्यावे लागणार नाहीत. सर्वच कामे मणिभाईंची फेडरेशन करणार आहे. आपण नुसत्या सह्या करायच्या पाणी घ्यायच... पिकं काढायची...!

स्वातंत्र्यानतर प्रथमच आलेले आशेचे किरण सांगवीकरांना सुखावून गेले सुजलाम सुफलाम हरितक्रांतीची ही धडक योजना मोठ्या थंडीतही उबदार वाटली.

□

मणिभाई, अण्णासाहेब मगर यांनी या गावात बैठक घेतल्यावर सर्वजण या योजनेत सहभागी झाले.

एक दिवस पंचायतीच्या बाहेर कट्ट्यावर सर्व शेतकऱ्यांच्या नावानी आणलेल्या स्टॅंपपेपर्सवर शेतकऱ्याच्या सह्या झाल्या, आणठे झाले.

प्रथम शासनाने या योजनेला तगाई कर्ज दिले. पच्याण्णव हजार पाचशे रु तगाईकर्जावर उपसा जलसिंचन योजनेचे काम फेडरेशनने सुरू केले. लिफ्टच्या कामाचा शुभारंभ झाला.

गावाच्या दिनक्रमात थोडा बदल झाला. जे रिकामटेकडे होते त्याच्या गप्पाना चघळायला लिफ्टच बाटुक मिळाल. जे कामधंद्यासाठी बाहेर जात अशाना गावातच कामधंदा उपलब्ध झाला. काम हळूहळू सुरू झाल.

काही दिवसानंतर काम एकाएकी बद झाल.

इंजिनियरने निवडलेली जागा मणिभाईंनी नापसत केली. झालेले काम रद्द केले. लिफ्टची जागा बदलून ती गावच्या खालती विष्णू मंदिराजवळ आली. कामास पुन: सुरुवात झाली. स्थलांतरात वेळ आणि पैशाचा अपव्यय झाला.

शेतकऱ्याना फशाचच काही नव्हतं. फेडरेशनने निर्णय घेतलाय म्हणजे बरोबरच असणार हा विश्वास.

खरं कारणही तसंच होतं. लिफ्टच्या जुन्या ठिकाणी पाण्याचा साठा उन्हाळ्यात कमी झाला असता आणि नव्या जागेवर मुळातच डोह होता शिवाय नव्या जागेपासून थोड्याच अंतरावर पुढे बंधारा होणार होता आणि त्यामुळे पाण्याचा साठा उन्हाळ्यातही पुरेसा होणार होता.

त्यामुळे मणिभाईंचा निर्णय योग्य होता. आज तो बंधारा असल्यामुळे त्या वेळच्या त्या निर्णयाचे प्रत्यतर येते.

विष्णू मंदिराजवळ लिफ्टच्या कामाने गती घेतली. लिफ्टघर बांधून झाले. पाईपलाईन आणि बांधबंदिस्तीची कामे राहिली होती. लिफ्टघरातील वायरिंग पपसेट इ. काम झाले होते. तरी वर्षभरातच काम पुन. बंद पडल. पैसा संपला होता, खर्चाच्या अंदाजापेक्षा खर्चात वाढ झाली. त्यामुळे काम अर्धवट पडले. असेच त्यानंतर सहा-सात महिने झाले आणि पुन: नेतेमंडळी आली.

शेतकऱ्याची पुन: बैठक झाली. सर्व अडचणी त्यांना समजावून सांगण्यात आल्या आणि उल्लेखिलेल्या स्टॅंपपेपरवर बँक ऑफ इंडियाकडून कर्ज उचलण्यात आले या कर्जासाठी शासनाने हमी दिली.

तीन लाख, दोन हजार, तीनशेपचाण्णव रुपये आल्यावर कामाने गती घेतली आणि सहासष्ट साली सुरू झालेली योजना एकाहत्तरला पूर्ण झाली.

सहासष्ट साली या योजनेला तगाईतून जे कर्ज उचलण्यात आले, त्यातून वस्तुत: काम पूर्ण होण्यास काहीच हरकत नव्हती; परतु आपल्या आवाक्याबाहेरची योजना 'हवेली तालुका लिफ्ट इरिगेशन फेडरेशन'ने आखली. त्याकरता प्रचंड पगाराचे अधिकारी नेमले. त्यावरचा व्यवस्थापन खर्च अवाढव्य झाला. या कामाशिवाय पूर्वीचा अनुभव शून्य असणारा अधिकारी वर्ग, अशिक्षित, अडाणी शेतकरी आणि नेतेपणात वावरणारी पुढारीमंडळी यामुळे व्यवस्थापनात ढिलाई आली. यामुळे ज्या वेळी लिफ्ट पूर्ण झाली तेव्हा शेतकऱ्यांना हायसे वाटले. अनत अडचणीतून प्रचड कर्जाचा बोजा घेऊन लिफ्ट चालू झाली. चार-पाच वर्षे वाट पाहून शिणलेल्या शेतकऱ्यांनी कांदा लावला. कांद्याला बाजार चांगला होता. कांदा निर्यात होऊ लागला होता. पाणी आहे, शेतात बागाईत होईल. खूप वर्षांनी घरात पैका खेळेल. निकडीची देणी देता येतील. पोराबाळाच्या अगावर चांगलेचुंगले कपडे घालता येतील.

लिफ्ट सुरू झाली; पण सर्व शेतकऱ्यांना पाणी मिळाले नाही. नतर वाढविलेल्या दोन हजार फूट पाईपलाईनमधून पाणी गेलेच नाही ! त्याच्या पुढील पाण्याच्या पाटातून

पाणी चढलेच नाही. काही ठिकाणी पाटांची रचना चुकली. त्यामुळे भिजणारे क्षेत्र जेवढे अपेक्षित होते त्याच्या निम्म्यानेसुद्धा शेतीला पाणी मिळाले नाही. सहाशे एकरांऐवजी दोनशे एकर जेमतेम भिजले !

आणि निसर्गानेही दगा दिला.

पावसानं पाठ फिरवली. नदीचं पाणी एक-दोन पाळ्यातच संपलं आणि संपूर्ण कांदा पाण्याअभावी जळून गेला. सर्व आशा आकांक्षावर पाणी पडले !

पुनः एकदा सांगवीकरांनी आपल्या नशिबाला दोष दिला.

आसपासचे गावकरी म्हणू लागले. 'गावच बेकार, कष्ट करायला नकोत. बागाईत करायला गेले. असंच व्हायचं !'

बहात्तरला नदी कोरडी पडली. गुराना चारा झाला नाही, पोटाला अन्न नाही. सर्वत्र हीच परिस्थिती. त्यामुळे कामधंदाही बंद झाला. शिवाय आजवर ज्यानी कधी मोलमजुरी केली नाही, त्यांचेवर मानहानीची पाळी आली. सगेसोयरे हिणवू लागले. दुष्काळाची भीषण छाया घेऊनच त्र्याहत्तर साल उजाडले. पावसानं दडी मारली. नदी, विहिरी कोरड्या पडल्या. शेतकरी हवालदिल झाला. आठ आठ दिवस अन्नपाण्यावाचून जाऊ लागले. कधी नव्हे ते झाडपाल्यावर जगणं आलं. किमतवान बैलंखिल्लारं मातीमोलानं विकावी लागली. काही जणांनी गुपचुप गाड्या जुंपल्या आणि थेऊरच्या कारखान्याकडे हाकल्या. काही जणानी जड अंत:करणाने 'मुंबै–पुण्याची' वाट धरली. एक एक जण गाव सोडायचा विचार करू लागला. तशाही स्थितीत काही जण गावाला चिकटून राहिले. उसनं पासनं करीत लाचारीनं जगत कर्ज काढीत जगू लागले. बायकोच्या अंगावरचे मणीमंगळसूत्रसुद्धा प्रसंगी काहीनी मोडले....

आशा एकच....

पाऊस पडेल....

पाऊस पडेल....

या वर्षी तरी पाऊस पडेल. धान्य घेता येईल; पण आपली वाडवडिलांची सोन्यासारखी काळी आई वाऱ्यावर सोडून जायचं नाही. जिनं आजवर घास दिला, चारा दिला, त्या मायेच्या मायला अंतर द्यायचं नाही.

पण...

दुर्दैवाचे दशावतार एवढ्यातच संपायचे नव्हते.

बँक कर्जाच्या वसुलीच्या नोटिसा शेतकऱ्यांना आल्या.

फेडरेशनच्या पाणीपट्टीच्या नोटीसा आल्या.

ज्याना पाणी मुळीच मिळाले नव्हते त्यांना पण नोटिसा आल्या. ज्या शेतकऱ्यांना एकएकदा, दोनदोनदा पाणी मिळाले त्यांना पूर्ण वर्षाच्या म्हणजे संपूर्ण पिकाच्या (सुमारे दहा ते बारा पाळ्या) पाणीपट्टीच्या नोटिसा आल्या.

फेडरेशनने नेमलेल्या पाटकऱ्यानी पाण्याच्या पाळ्या करताना, पाणी वाटप करताना, जो त्या पाटकऱ्यांना खूष ठेवील अशांना बेहिशोबी पाणी दिलं. एकतर, सर्वांना पुरेल एवढं पाणी नसताना, बड्या बागाईतदारांना पाणी देऊन, एक-दोघांचेच हित साधून, स्वतःचा फायदा करून घेतला. फेडरेशनच्या अधिकाऱ्याकडे ज्यांनी पाणीपट्टी भरली, त्यांनी ती फेडरेशनकडे भरली नाही. पाणीपट्टीच्या नोटिसांमध्ये बँकेच्या


With Best Compliments From :

## M/s. Accurate Engineering Co. Pvt. Ltd.

67, Hadapsar Industrial Estate
P. O. Box No. 1202
Pune 411 013 ( India )
Telex : 0145-363-QRET-IN
Gram : 'Accuret' ★ Phone : 70158/59

*Manufacturers of* :

Precision Gauges, Instruments and Machine Tool

वसुलीच्या तगाद्यांचीही भर पडली.

शेतकरी वैतागला–

कुणीकडून या लिफ्टच्या नादाला लागलो आपण,

पूर्वी होतं ते खूप बरं होतं.

गावात एकमेकात विश्वास होता. पत होती. गरिबी असली तरी कुणी कुणाशी लबाडी करीत नव्हता आणि या लिफ्टच्या फंदामुळे काहीच्या काहीच होऊन बसल.....

नको ती लिफ्ट...

नको ते पाणी...

कुणी पुढारी नकोत...

आमचं आम्ही बघू...

नशिबात असेल ते होईल...

सागवी सांडस. एका विकास योजनेमुळे गावचा विकासच थांबला!'

भीमेच्या साडशीत सापडलेलं सांगवीगाव कर्जाच्या बोजानं वाकलं, दारूनं पिचलं. भांडण–कलागतीनं मोडून गेलं.

## २२ डिसेंबर

ग्रामायनचे शिवतक्रार म्हाळुंगीचे कार्यकर्ते नामदेव माळी आज सकाळी येऊन गेले. प्रसन्न चेहऱ्याच्या माळीची बोलण्याची ह्यातोटी काही औरच दिसली. प्रथम दर्शनीच छाप पाडणारा त्यांचा हसरा चेहरा. ग्रामायनचा पहिला पूर्णवेळ कार्यकर्ता.

हरिभाऊंशी कामासंबंधी चौकशी केल्यावर लाइटसंबधीच्या कामासाठी नामदेव पुण्याला निघून गेला.

दुपारी जेवण झाल्यावर बबनराव लोलेंच्या शेतावर गेलो. रविकांत आदरकर, हरिभाऊ आणि मी बबनराव लोल्याचा मुलगा आबा हा ग्रामायनचा कार्यकर्ता. तो शेतातल्या पिकांची माहिती देत होता. यांच्या शेतात एक विहीर आहे. सध्या नदीवर डिझेल इंजिन बसवून ते पाणी देतात गहू, कांदा, हरबरा, ज्वारी ही पिकं शेतात होती.

आम्हाला पाहून आणखीन एक दोघेजण आले. आबानं हरभरा आणला. हरबऱ्याचे घाटे खाताखाता बबनराव बोलत होते.

बबनरावांचा चेहरा शांत. चेहऱ्यावर एक अनुभवीपणाची झाक. पन्नास–बावन्नचं वय असावं. बोलणं समजूत घातल्यासारखं, सावकाश घरंगळत आल्यासारखे हळूहळू, शब्द पेरत बोलत. मधूनच बोलणाऱ्याकडे उत्तरालाच प्रश्नाचं रूप देऊन बोलायची ढब. डोळ्यांमध्ये एक प्रकारचे स्मित. डोक्यावर भलंमोठं पागोटं.

सांगवी गावात आल्यापासून या बबनरावानी मनात घर करून ठेवलं होतं. शेतावरून हिंडता हिंडता ते शेतीबरोबरच स्वतःची कहाणी सागत होते.

'हे सगळं दिसतंय पण या सगळ्यातनं पदरात फार थोडं पडत. माझा प्रयत्न असतो जास्तीत जास्त सुधारणा करावी. आपल्याबरोबर गाव सुधारावं. आपल्याला जे येतं ते दुसऱ्याला द्यावं. खूप वाटतं... खूप वाटतं... पण आता थकलो... या गावात खूप हालात दिस काढलं. एकतर कायम दुष्काळी परिस्थिती. आमचं गाव विचित्र. कुणाचा कुणाला मेळ नाय. अवो आम्हाला कशाचाच उत्साह नाही. जो तो कर्जबाजारी. या लिफ्टिमुळे सारं गाव नासून गेलं. पयली मणिभाई–अण्णासाहेबानी ही लिफ्ट आणली. त्याच्या आदी लोकाना सत्याची चाड होती, पण लिफ्ट जशी का बंद पडली तसं हे बिघडत गेलं. दुष्काळ पडला. गाव झपाटल्यासारखं झालं. पावसाचा टिपुस नाय. वर ह्ये लिफ्टचं कर्ज.'

बबनराव सांगता सांगता कामही करीत होते. त्यांच्या पोरीनं शेरडं आणली होती. बैलं आली होती. बैलांना चारा घालता घालता ते म्हणाले, 'अशा अजून दोन जोड्या हव्यात. तवा ह्या शेतीला उपयोग.'

आबानं एका शेळीचा पाय आपल्या गुडघ्यात पकडला आणि भांड्यामध्ये दूध पिळून काढलं. थोड्याच वेळात चहा आला. शेळीच्या दुधाचा चहा चांगला घट्ट होतो, पण दुधाला वास येतो काहीसा उग्र.

'आमच्याकडे म्हैस नाही. आता या लिफ्टनंतर जर्सी गाई घेऊ. चाललय हळूहळू–अहो हे काही नव्हतं. पूर्वी मस गुरं व्हती. जवा का ती लिफ्ट चालू जाली. आन समद्यांच्यापरमानं आमीबी कांदा लावला. कांद्याला दहा–बारा पाळ्या पाणी लागतं. एक–दोनच वाट्याला आलं आन पाणी संपलं. आत्ता सारख धरण नव्हतं त्यावेळला. समदं नुकसान झाल. पाणी देताना जो जोर करील, पाटकऱ्याला खूष ठेवील त्याला आधी पाणी मिळे. दोन हंगाम जालं त्यात कांदा गेला पर ज्वारी, गहू ही पिकं हाती आली होती. त्यातनं पाणीपट्टी देता आली असती. आमी सवता पट्टी भरली होती. पर म्हणावं तसं पिक नाय. काहींनी पट्टी दिली, काहींनी नाय दिली. लोकान्नी पट्टीत सवलत हवी होती. समदी वर्षाची पट्टी कशापाई देयाची? बहुतेकानी पट्टी भरली नाही. ह्या लिफ्टिमुळं पूर्वी कधी नव्हती एवढी भांडणं गावात आली. फेडरेशन काही ऐकायला तयार नव्हती. आधीच लोकाच्यात उत्साह कमी. त्यात ही विचित्र परिस्थिती. गावकऱ्याचं म्हणणं आसं की, साडेतीन–पावणे चार लाख रुपये कर्ज तुमी आमच्या बोकांडी मारलंत. चार वर्षं काम रेंगाळलं ह्या काय आमचा दोष नाय. शिवाय सांगितल्याप्रमाणे जे सभासद आहेत त्यांच्या जमिनीला पाणी मिळायला हवं होतं पण ते मिळालच नाही. मग पट्टी सगळ्यांकडून वसूल कशी करता? आनी त्यातलं काय तरी पैसं वाचलंच असतील की! त्यातनं भरा अस आमी म्हणालो. म्होरल्या वर्षी डबल घ्या. पर त्ये काई ऐकेनात. पाणी नाय म्हणून पिक नायत. पिकपाणी नाय म्हणून पट्टी नाय. पट्टी नाय म्हणून फेडरेशननं लाइटबील नाय भरल. आन मंग मंडळान बाकी थकली म्हणून वीज तोडली. आन लिफ्ट बद जाली...' बबनरावानी थोडक्यात लिफ्टपुराण ऐकवलं.

'फेडरेशनकडे पन्नास बावन हजार रुपये शिल्लक होते. त्यातनं त्याना देता आलं असतं पर समदाच काळाबाजार! फेडरेशनमध्ये गाव नव्हतं, गावातलं कुणी त्यात नव्हतं. जसं सरकार तशीच फेडरेशन. गावाच्या बाजूनं बोलणारं कुणीच नव्हतं.' आबा म्हणाला.

'समदं त्येंच दोष हुतं आसं नाय. आमी बी दोषी हुतोच. अवो त्ये कर्ज आपुन फेडायचं, की फेडरेशनने; ह्येच आमच्यापैकी कित्येकांना ठावं न्हवतं. त्यात गावचं पुढारपण ज्येंच्याकडं त्ये हपापलेलं, त्याना बी काम जाल्यावर फेडरेशनन बाजूला सारलं. पाणी आलं. पर पिक कोणतं घ्यावं याचं ज्ञान नाय. खतं नाय दिली. समदे लावत्यात कांदा मग आपुनबी लावला, असं झालं. अवो ह्ये फेडरेशन काय फक्त सांगवीतच हाय

काय ? बेचाळीस गावात काम करीत हुतं.' एकजण.

'बेचाळीस काय घेऊन बसलाय. समद्या लिफ्टचं आसंच. सव्वीस योजना झाल्या बेचाळीसपैकी. सव्वीसपैकी सांगवी परमानं चौदा बंद पडल्यात. काही अपुऱ्या राह्यल्या. बारा चालू हायती. आता ह्ये पलीकडची न्हावी सांडसची लिफ्ट बगा. चालू हाय. आमच्या बरूबरचीच. पर बँकाचं कर्ज काय कसलं काय, काय बी फेडलं नाय. लाईटबील भरत्यात बाकी काय करत्यात, त्येंचं त्येनाच माहीत.' आणखी एकजण.

चहा झाल्यावर आम्ही निघालो.

**ज्याच्या ज्याच्याशी बोलावं तो हीच कहाणी थोड्याफार फरकानं सांगत होता.**

लिफ्ट योजनेतले पूर्वीचे जाणकार आणि आत्ताचे चेअरमन किसनराव लेले म्हणाले, 'फेडरेशन आणि गाव यांच्यात विश्वास राहिला नाय. योजना करणारे बाजूला रायले. राववणाऱ्यानी ती नीट राबविली नाय. पैसा खेळायला लागल्यावर साधे कारकून–पाटकरी माजले. फेडरेशनचं या स्कीमवरलं लक्षच उडालं. त्यांना पैसा मिळत होता. नवीन कामं निगत होती. नेत्यांचं लक्ष पुढं होतं नव्या योजना आखण्यात. मागं बंद पडलेल्या लिफ्टकडं कुणाचंच लक्ष न्हवतं.'

'श्याहत्तरचा दुष्काळ गावाची हाडं काढून ग्येला,' बबनराव म्हणाले. नोटिशीनी आमी हबकलो. बँकेच्या नोटिशीनं आमचं डोळं खाडकन् उगडले. जमिनीचे लिलाव डोळ्यासमूर दिसू लागले. जेवान गोड लागना. गावात कायबी करमना. शेतात राबून कायबी हुनार नाय आता. एक दिस मी सवता गाव सोडून गेलतो. गाडी जुपली आणि थेऊरला गेलो. काय करणार ? परपंच मोठा. पोरं ल्हान. आपुन नाय शिकलो, पोरानी शिकाव वाटायचं. मजुरी करायची ठरवली. थेऊरच्या साखरकारखान्यावर गाडी नेली. एक दिवस काम चार दिवस रिकामं. उपासमार व्हायला लागली. तिथल कामाच तत्रच जमेना.' ठेकेदार मुसलमान होता. त्येला खुश ठेवणं जमेना. बबनराव जुन्या दुःखद स्मृतीत गुंतले. *त्याच्या चेहऱ्यावर त्या* काळी भोगलेल्या वेदना स्पष्ट जाणवू लागल्या

'चांगली वीस पचवीस एकर जमिन. पर मजुरी केली. मनात एकच. पोरास्नी शिकवायचं. माजा धाकला पोरगा कायम पयला यायचा. त्याला इंजिनियर करायचं हुतं मनात. बारावी झाला त्यो आता नेव्हीची परिक्षा पास झालाय. मद्रासला जाईल.'

हळूहळू आम्ही बबनरावाचं शेत ओलांडून बांधावर आलो होतो. उन्हं उतरणीला लागली होती.

बबनरावानी पडेल तो कामधंदा केला. मोलमजुरी केली आणि पुनः गावात आले. शेतीत लक्ष घातलं. बाहेर जे पाहिल ते ज्ञान शेतीत वापरलं. जुनी औजारं रद्द केली. नवीन सुधारित कुळव, पावर तयार केले. स्वतः अपार मेहनत घेतली. देशोधडीला लागलेला संसार पुनः व्यवस्थित उभा केला. स्वतःच्या ससाराबरोबर गावाची घडी व्यवस्थित बसविण्यासाठी धडपड केली. त्यांचा मुलगा आबा. हा आज गावातील प्रमुख कार्यकर्ता आहे. वडिलाची जाण असलेला. समजुतदार. ह्यान आणि हिरामण लोले *यांनी नवीन कामात खूपच सहकार्य केलय.*

आपल्या शेतीबरोबर आपल्या शेजाऱ्यांच्या शेतीकडही बबनरावांचं लक्ष असतं. नव्यानं


आजकाल, पाच पंचवीस रुपये बचत म्हणून बाजूला ठेवणे सहज शक्य आहे.
पण ठेवणार कोठे ? घरात ? छे, छे ....
आपल्याला फायदेशीर बचत योजना आमच्याकडे आहेत !
आजच आमच्या नजीकच्या शाखेस भेट द्या आणि
बचतीचा शुभारंभ करा !

**जनतेची बँक**

**जनता सहकारी बँक लि., पुणे.**

मुख्य कचेरी : १४४४, शुक्रवार पेठ,
थोरले बाजीराव रोड, पुणे ४११ ००२
दूरध्वनी : ४४ ३२ ५८

महाराष्ट्रातील ७ जिह्यात ३३ शाखा व
३ एक्स्टेंशन कौंटर्स

भा. रा. किराड
कार्याध्यक्ष

ह. ना कुंदेन
कार्यकारी संचालक

सुरू होणारी लिफ्ट पुन: बंद पडू नये यासाठी ते दक्ष रहाणार आहेत. पाण्याचा उपयोग सर्वांनी व्यवस्थित करावा यासाठी अकरा अकरा जणांचे गट करून एकमेकाला सहकार्य करण्याची कल्पना त्यांच्या मनात आहे. पिक स्पर्धा त्या अकरात घेऊन आपापसात चढाओढीनं अधिक धान्य काढायची कल्पना त्यांच्या मनात आहे.

बबनरावांना सोडून आम्ही गावातल्या रस्त्याला लागलो. वाटेत दत्तोबा पावळे भेटले.

अंगानं सशक्त, वर्णानं तांबुसगोरे दत्तोबा आम्हाला पहाताच थांबले. 'बबनदादाकडे जाऊन आला जनू...'

दत्तोबांनी गाडी थांबवली. आम्ही गाडीत बसलो. गाडीत दत्तोबांच्या मंडळींबरोबर मुलंपण होती. गाडीत जळणासाठी वेड्याबाभळीचं फाटे भरले होते. गाडीच्या कठड्यावर आम्ही कसेबसे घट्ट धरून बसलो.

'चारी दुरुस्ती करायला हवी. फेडरेशनने ती अर्धवटच टाकली होती. आता पंधरा वर्षात पार फुटून गेलीय.' दत्तोबा म्हणाले.

'हां आता राहिलेली सगळी कामं करून घेऊ एकदा.' हरिभाऊ म्हणाले.

मी फेडरेशनचं निसटणारं सूत्र पकडलं.

लिफ्ट बंद पडल्यावर तुम्ही लोक नुसते गप्प कसे काय बसलात...?' मी विचारलं.

कासरा थोडासा सैल सोडत दत्तोबा म्हणाले,

'आता गप कशानं वो. एकतं आमच्या गावाला कोणी पुढारी नाय. म्हटलं तर समदे पुढारी. नायतर समदे अडाणी गडी. आमी आपलं आपापसात कलागती लावण्यात म्होरं. गाडीचं चाक मोठ्या दगडावरून गेलं आणि हिसका बसला.

'आमी फेडरेशनच्याकडं हेलपाटं मारायचं आनी त्यांनी सांगायचं पाणीपट्टी भरल्याशिवाय लाईट येणार नाय. फेडरेशननं ज्यांची पाणीपट्टी जमा झाली होती त्यात भर घालून वीज बील भराया होवं हुतं. पर त्यांचं अधिकारी काम करिनात, नुसतंच पैसं हवेत. बरं त्येची पावती उद्या दिवू म्हनल्यावं कोन पैसं देनार ? अवो, ज्यांच्या जमिनीला बँकेचा पंधराशे हप्ता यायला हवा त्येला पंधरा हजार आला, ह्ये काय चाललंय हे आमाला समजेना. प्रत्येकजन कावला हुता. मोलमजुरीशिवाय काय बी जमत नव्हतं. काईजन त्याकरता गावाबाहेर गेलं. इथं जगन्याचाच प्रश्न आल्यावर कोण त्या लिफ्टीच्या अन् फेडरेशनच्या मागं लागतंय. शिवाय गावात एकी हवी. मग पुढारपण कोण करणार...?' एव्हापर्यंत गावात गाडी शिरली होती. अंधार पडायला लागला होता. दत्तोबांच्या घरासमोर गाडी थांबली. बैलांना सोडून दत्तोबा आले.

'अशा परिस्थितीत ह्ये बंधाऱ्याचं काम निगालं बगा. गावाला काम मिळालं. बाहेरगावी मजूरीला जाणारे गावात परतले. सत्त्याहत्तरला बंधारा झाला. आन वाटलं आता काय तरी बदल हुनारं पर कनचं काय अन् कनचं काय! बंधाऱ्यात पाणी साठलं. कधि नव्हे इतकं पाणी गावकऱ्यांनी पाहिलं, पर त्या पाण्याकडे नुसतं बगत राहण्यापरिस सांगवीकरांच्या कपाळी काय हुतं ?...'


दत्तोबा बोलायचे थांबले. माझी उत्सुकता ताणली जाऊ लागली.

'का बरं पाणी आल्यावर तुम्ही पाणी का घेतलं नाही...?' मी विचारलं.

'हिच तर पनौती हाय सांगवीकरांची. सांगवीचा कोल्हापूर बंधारा म्हणून त्याचं नाव हाय. पर सांगवीकरांच्या शेतीला पाणी नाय. या बंधाऱ्याचा फायदा व्हावी सांडस, पिंपरी सांडस, भुरकेगाव, विठ्ठलवाडी यांना झाला.' हिराम्मण भगवंत म्हणाला.

'आम्ही समदे दरिद्री, जवळ कुणाच्या पैसा नाय. बँकांकडे गेलो जमिनीवर कर्ज मागायला, तर सातबाराच्या उताऱ्यावर बँक ऑफ इंडियाचं नाव खात्यावर. भूविकास बँक कर्ज देईनात. कुणी दारात उभं करिनात-बाप जावू दिना, आई जिवू घालिना अशी तऱ्हा झाली. आमी आहो असंच रायलो, आन मग काय, रोज मरे त्याला कोण रडे अशी गत झाली आमची.' दत्तोबा म्हणाले.

बाहेर गारठा चांगलाच जाणवू लागला



होता. अंधार गच्च पडला होता. समोरच्याचा चेहरा दिसत नव्हता. हातातल्या पेटलेल्या बिड्याचे लाल गुज हलताना दिसत होते. रामराम करून आम्ही घराकडे परतलो.

¤

सागवीची वेदना अनेक पदरी होती. त्याला अनेकजण कळतनकळत कारणीभूत झाले होते. बुडत्याचा पाय खोलात या म्हणी-प्रमाणे सागवीकराची अवस्था झाली होती. एकीकडे हे सांगवीचं अस तर दुसरीकडे याच भीमेच्या दुसऱ्या तिरावरील जवळच्या विठ्ठलवाडीची स्थिती काय होती !

सागवीच्या बाजूचा नदीचा किनारा खड-काळ मुरमाड. सांगवीकरांच्या जमिनी नदी-पासून खूप लांब. तर विठ्ठलवाडीची जमीन काळीभोर, नदीला लागूनच ! एकीकडे अठरा विश्वे दरिद्रय, बारा महिने दुष्काळ. तर दुसरीकडे विठ्ठलवाडी म्हणजे समृद्धीचं पंढरपूर ! चोविस तास विठ्ठलवाडीतले पप चालू असतात पचवीस एक पंपसेट किनाऱ्या-वर असून त्याच्या पाईपलाईनचे जाळे पसर-लेले दिसते. सर्वत्र हिरवीगार शेती. उस-गहू कांदा अशी बागाईत पिके. मदिराचे उच रंगीत कळस डौलदारपणे दिसतात. गिलावा केलेल्या घराच्या भिंती नजरेत भरतात. घराच्या लालमंगळूरी कौलावरूनही नवी समृद्धी दिसून येते विजेवर रात्रदिवस चाल-णारे पप हे विठ्ठलवाडीच्या जिवंतपणाचे रहस्य होते !

सागवीत आणि विठ्ठलवाडीत विलक्षण तफावत होती.

हरिभाऊ म्हणाले—

'ही विठ्ठलवाडी म्हणजे चार वर्षापूर्वी-पर्यंत तळेगावढमढेरेची एक वाडी होती. आता स्वतन्त्र गाव आहे. ग्रामपंचायत आहे. गावात पंचायतीची स्वतन्त्र इमारत आहे. वाचनालय आहे. तालिम आहे. प्राथमिक शाळा आहे. माध्यमिक शाळा आहे सरपंचा-कडे फोन आहे गावात पोस्ट ऑफिस आहे. गावाची वस्ती सांगवीच्या निम्मानं असेल. गाव दारूमुक्त आहे म्हणजे गावकरी दारू पित नाहीत.'

हरिभाऊंच्या माहितीने सांगवीसांडस मला अधिकच केविलवाणे दिसू लागले. केवळ चुकीच्या पद्धतीने केलेल्या अव्यवस्थित विकासाने या गावाचा फक्त विकासच थाबला नाही तर हे गाव आतून उध्वस्त झालेय. माणसांची काही करण्याची उमेदच नष्ट झाली. शहरी लोकावरचा विश्वास उडाला. कुणी काही चांगलं सांगायला लागला की, गावकरी तिथून दूर होऊ लागले. त्याना त्या सागण्यात भ्रष्टाचार-स्वार्थ दिसू लागला. आता आपला गाव असाच रहाणार ..कर्ज-बाजारी. एखाद्या असाध्य रोगान अथरूणाला खिळलेल्या रोग्यासारखी अवस्था गावाची झाली.

त्याची जीवनावरची — धर्मावरची — सामाजिक कार्यावरची वासनाच उडाली. निवडणुका-भाषण-मोर्चे-चळवळी — याच्या-मध्ये गावकऱ्यांना रस उरला नाही.

चहूबाजूनी बदनाम झालेले गाव. दैवावर हवाला ठेवून शेतीत नागर घालणारा शेतकरी.

¤

रात्री जेवण झाल्यावर पंचायतीत गेलो. पचायतीच्या बाहेरच सरपंच भेटले तरुण, साधारण पचवीस ते तीस वयाचे श्री रामचद्र शितोळे. हे ट्रान्स्पोर्टचा व्यवसाय करतात. गावाला इतराच्या बरोबर आणण्याचा त्याचा प्रयत्न दिसला. शाळा पुन: व्यवस्थित चालावी यासाठी त्यानी पचायतीत ठराव करून जिल्हा परिषदेत प्रयत्न केला आणि एका शिक्षकाच्या जोडीला नवीन योजनेतून एक शिक्षिका आलीय त्यामुळे आता शाळा नियमितपणे रोज उघडली जाईल. पूर्वी शासकीय कामाच्या वेळेला शाळा बद असे. किंवा एकच शिक्षक असल्याने त्याना रजेवर जायचे असल्यास आठ आठ दिवस शाळा बद राही. पाचवी इयत्ता येत्या जून ८५ पासून सुरू होणार आहे. पचायतीचे उत्पन्न म्हणजे सरकारी ग्रामसुधार अनुदान आणि घरपट्टीचे उत्पन्न. घरं जुनाट, दुरुस्त्या न झालेली, बरीचशी पडकी, त्यामुळे घरपट्टी कमी. त्यामुळे जोपर्यंत नवीन घरं होत नाहीत तोपर्यंत घरपट्टीत वाढ होणार नाही. त्यामुळे गावात सुधारणा करता येत नाहीत.

लोकवर्गणी काढण्यासारखी गावकऱ्याची स्थिती नाही. लिफ्ट चालू झाल्यावर काही बदल होतील लोकांकडे पैसा येईल त्यामुळे घरं दुरुस्त होतील. काही सुधारणा गावा-करता करायच्या म्हटल्या तर लोकवर्गणी काढता येईल. पिण्याच्या पाण्याची सोय अशा लोकवर्गणीद्वारा करायची योजना आहे.

ओघात जुन्या विषयावर गप्पा निघाल्या, 'लिफ्ट बद पडल्यावर कुणीच कसे प्रयत्न केले नाहीत' असं मी बोलता बोलता विचारलं. शितोळे म्हणाले,

'लोकांना फेडरेशनने विश्वासात न घेतल्याने, लिफ्ट सुरू होण्यातील अडचणी कोणत्या आहेत हेच लोकांना माहीत नव्हते, शिवाय लिफ्ट पुन: सुरू करायची म्हणजे बँकेचे कर्ज फेडल्याशिवाय शक्य नव्हतं. सुरू करायला येणारा खर्च पहाता गावकऱ्याच्या दृष्टीनं ही लिफ्ट सुरू होणं अशक्य कोटीतली गोष्ट होती. फेडरेशननेच काही करायला हवे होते. पण फेडरेशन ही संस्थाच मुळी सर्वांचा विश्वास गमावून बसली होती. कारण एकूण तेरा बंद पडलेल्या योजनामुळे साऱ्या तालुक्यात फेडरेशनविरोधी वातावरण तयार झाल होतं. 'लिफ्टग्रस्त' अशा तेरा गावातील लोकाचा एक मेळावा घेण्यात आला आणि फेडरेशनच्या विरोधात एक आरोपपत्र तयार करण्यात आले. त्याच्या प्रती जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, गृहमत्री आणि स्वत: फेडरेशनचे सचालक याना देण्यात आल्या. त्याचबरोबर कौन्सिल हॉलवर या मागण्यासाठी मोर्चा नेण्यात आला पाच ते सहा हजार शेतकरी या मोर्चात सहभागी झाले होते.' शितोळे मोर्चासबंधी माहिती देऊ लागले.

— बंद लिफ्ट शासनाने ताब्यात घेऊन पुन: सुरू कराव्यात.

— फेडरेशनच्या कारभाराची चौकशी व्हावी आणि हिशोब सादर करावेत.

— लिफ्ट बद असल्यामुळे बँकाचे कर्ज-वसुलीचे-जप्तीचे आदेश रद्द करावेत.

— फेडरेशन शासनाने ताब्यात घ्यावे.

अशाप्रकारच्या मागण्या होत्या. तेरा गावातील शेतकरी सघटित झाले परंतु त्यावेळी मोर्चा अडविण्यात आला. शेतकऱ्याना अटक करण्यात आली. आठ आठ दिवस येरवड्यात जेलची हवा खाण्यास पाठविण्यात आले. शेतकऱ्यांचा काहीही दोष नसताना शेतकऱ्याना विनाकारण त्रास झाला. त्यानंतर हा लढा तीव्र करण्यात आला. सभा—मोर्चे असे धडक कार्यक्रम घेण्यात आले. अखेर शासनाने यात लक्ष घातले. स्वत: शरद पवार त्यावेळी गृहमंत्री होते. त्यानी या

प्रश्नात लक्ष घातले.' श्री. मधुकरराव चौधरी यांची चौकशी समिती नेमण्यात आली. त्याच्या अहवालाच्या आधारेच शासनाने तगाई कर्ज माफ केली आणि बँक कर्जाला शासनच हमी असल्याने शासनाने बँक ऑफ इंडियाचे कर्ज भरून टाकले आणि सदरहू रक्कम शेतकऱ्यांकडून दहा वर्षात समान दहा हप्त्यात वसूल करण्याचे ठरविले.

सागवीपुरतं बोलायचं ठरविलं तर कौन्सिल हॉलवर ज्यावेळी मोर्चा नेला होता त्यावेळी मणिभाई स्वतः आले होते; परंतु ते हिशोब देऊ शकले नाहीत. सागवीच्या योजनेतील सर्व खर्च वजा जाता सुमारे बावन्न हजार रुपये शिल्लक होते अस म्हणतात. पण त्यानंतर आजमितीपर्यंत हा विषय तसा अर्धवटच राहिलाय.

या फेडरेशनविरोधी मोर्चामुळे गाव कधी नव्हे ते एकत्र आले. त्याने चळवळ केली. पण ते तेवढ्यापुरतच झालं. पुन: पुढे सर्वकाही थंडच. पहिले पाढे पचावन्नच !

सरपंचाच्या बोलण्यात लिफ्ट पुन्हा सुरू होण्याने, ग्रामायनच्या सहकार्याने या गावाचा कायापालटच होणार आहे.

¤

'सोनार, शिंपी, कुलकर्णी, अप्पा यांची संगत नकोरे बाप्पा' अशी एक जुनी म्हण आहे. याच्या तावडीत सापडणारा आपल्या जवळील काही तरी गमावून बसणार. कारण यांना साऱ्या गावाची माहिती असते. सर्व गावाच्या नाड्या मोजमापे, उचापती, भाडणे यांना ठाऊक असतात. बऱ्याच वेळा ही भाडणे विकोपाला जातात ती याच्या कानगोष्टीमुळेच !

पण सांगवी गावात या परंपरागत बलुतेदारांपैकी कुणी नाही ! या गावात सोनार-कुलकर्णी यापैकी कुणी राहिल नाही. न्हावी या गावाला पूर्वीपासून नाहीच !

शेजारच्या 'न्हावी' साडसवरून न्हावी आठवड्यातून दोनदा येतो आणि माऱ्या गावाची हजामत कट्ट्यावर बसून करतो ! आठवड्याच्या बाजारासारखी न्हाव्यापुढे गर्दी जमलेली असते !

वरील म्हणीला अपवाद ठरणारे शिंपी मात्र गावात आहेत! धोंडिबा शिंदे याच्याकडे भैरोबांचं गुरवपणसुद्धा आहे.

गावाचं भूषण ठराव असं हे व्यक्तिमत्त्व. शिडशिडीत अंगकाठीचे. गावात कुठं काही बरवाईट घडलं तर प्रथम शिंदे तिथे हजर असतात. गावातल्या धार्मिक तसेच सामाजिक कार्यात झटून मेहनत करतात. विष्णू मंदिरात गोकुळअष्टमीला सप्ताहभर जे कार्यक्रम होतात त्यात पिंगळेकाका, बबनराव लोले, मच्छिंद्र तळेकर, श्री. गजरे, शांतारामबुवा, आनंदराव वावळे याच्याबरोबरच शिंदे सतत झटत असतात. गावातल्या भजनीमंडळाचे प्रमुख.

त्याच्याकडे रात्री बसायला गेलो. गावात याच्याकडे आणि ग्रामपंचायतीत पेपर येतो. पेपर वाचून मग घरी जायचं असा क्रम. त्यामुळे इथच बरेच जण भेटत. शिंदेबरोबर गप्पा सुरू झाल्या.

'कस काय वाटलं आमच गाव?' ते म्हणाले

'मला तर हे गाव आवडलं. लोक स्वभावाने चांगले आहेत. एकीने वागताहेत. साधारणपणे ग्रामीण भागात आलं की, बोलताना जी अविश्वासाची भावना दिसते ती इथं नाही दिसली' मी म्हणालो

'अहो हे सर्व आज दिसतंय आणि ग्रामायनमुळे हा बदल झालाय. ग्रामायनमुळे हे गाव आज इतक सरळ दिसतय; पण पूर्वी असं नव्हतं. फार पूर्वी हे गाव पंचक्रोशीतलं नंबर एकचं गाव होतं पण हळूहळू सद्गुणांचा ऱ्हास झाला आणि दुर्गुणाची वाढ झाली आणि गावाची वाताहत झाली पूर्वी एक कीर्तनकार आले होते त्यांनी गावाची स्थिती पाहून उद्‌गार काढले 'हे विष्णूपूर नसून राक्षसपूर आहे.'

सर्वजण हसले. शिंदे म्हणाले,

'पाहिलत, आम्हाला ती पण स्तुती वाटली.' सर्वजण आता एकदम गप्प झाले.

'आमचं गाव हे इतर गावाच्या दृष्टीने नरकपुरीच होतं. अहो इथं अख्ख्या जिल्ह्यात आढळणार नाही अस पुरातन विष्णू मंदिर आहे लाबलाबून लोक येतात दर्शनाला; पण गावकरी तिथं जातील तर ..मग काय! पलीकडचं विठ्ठलवाडी गेल्या पाच-सात वर्षात *बदललं तिथलं विठ्ठल मंदिर* सुधारलं म्हटल्यावर आम्ही गावकऱ्यांनी विष्णू मंदिराच्या जीर्णोद्धाराच काम हाती घेतल. गावातली चिंचेची झाडं तोडून ती विकून कामास सुरुवात केली. जुना सभामंडप पाडून त्या ठिकाणी नव्यान बांधकाम सुरू केलं. आसपासच्या गावातून पैसा जमा झाला, बारा हजार रुपये जमा झाले. विटाच काम पूर्ण झालं आणि पैसा संपला. स्लॅबच्या खर्चाचा अंदाज न आल्याने काम पैशाअभावी अर्धवट राहिले त्यात काहीच्या जवळच्या पैशाचा हिशोब न आल्याने वाद सुरू झाला आणि काम अर्धवट पडले ते पडलेच लोक आता लिफ्ट झाल्यावर पुन: त्याकडे लक्ष देऊ अस म्हणतात. लिफ्टच ते तस आणि देवळाच हे असं'

शिंदे बोलता बोलता थांबले-चहा आला होता. चहा घेता घेता त्यांनी माहिती सांगितली, 'अस म्हणतात बरंका लिफ्टच्या पैशामधून फेडरेशनच्या काही लोकानी सिमेंटपाईपचा कारखाना काढला. शिवाय प्रत्येक स्कमला एक ट्रॅक्टर दिला होता; पण संचालकानी जवळ केलेली माणसं भ्रष्ट होती एक उदाहरण देता येईल रेव्हेन्यू खात्यातला एक कारकून रेव्हेन्यूकडे असतानाच लाचलुचपत विरोधी पथकान त्याना पकडलं होत आणि खटला भरला होता. त्याच्या विलंबित काळात संचालकानी त्याना फेडरेशनकडे कामाला घेतले. कामावर असतानाच त्याच्या केसचा निकाल लागून त्याना शिक्षा झाली. कामावरूनच त्याना पकडून नेण्यात आले; पण सुटून आल्यावर पुन: त्याला कामावर घेण्यात आले ! आता हा माणूस मोठा आसामी झालाय 'हवेली लिफ्ट योजनेचा' तोच सूत्रधार होता अशा अविश्वासू माणसामुळे लोक मणिभाईंनाच शेवटी दोष देतात.'

'आमचं गाव बिघडायला अनेक कारणं आहेत; पण लिफ्ट हे त्यातल मुख्य कारण. आर्थिक स्थिती चागली नसल्याने लबाडी वाढली. उधारी वाढली. गावाची प्रामाणिक संस्कृती बिघडली. अहो, जो धंदा वाईट, दारू गाळायचा, त्याची भाडी चोरीला जायचो ! गावगावच्या जत्रेतनं दारुड्याचं गाव म्हणून चर्चा व्हायची. गावातलं राजकारण म्हणजे लबाडीचा धंदा *वाटतो सर्वत्र चोरानाच लोक जवळ कर*तात. सत्याची बाजू कुणी घेत नाही.'

शिंदे पोटतिडिकेन सांगत होते. आता सर्वजण गंभीर बनले होते. शिंदे याच बोलणं पटल याअर्थी माना डोलवत होते.

### भजनी मंडळ

शिंदे याचं भजनीमंडळ आहे. आठवड्यातून एकदोनदा दहा–बारा जण एकत्र येऊन भजनं म्हणतात. एक बाजाची पेटी, एक मृदुंग, टाळजोड, वीणा इ. साहित्य आहे

१९६० साली, शिंदे त्या वेळी तरुण होते. समाजकल्याण खात्यातर्फे झालेल्या भजनाच्या स्पर्धेत, शिंदे यांच्या भजनीमंडळानं सांगवी गावाला पहिलं बक्षीस मिळवून दिलं होतं!

सामाजिक क्षेत्रात चर्चा करावी असं हे पहिलंच आणि एकमेव कृत्य! रागदारीचे शिक्षण झालेले ते एकटेच. बाकी सर्वजण नवखे. त्यांना हाताशी धरून शिंद्यांनी चमत्कार घडवून दाखविला होता. एक मोठी सतरंजी, एक मृदुंग आणि अठरा टाळजोड बक्षीस म्हणून मिळाले. काही दिवस छान सूर लागला होता! रात्री पहाटेपर्यंत भजनं रंगू लागली. गावोगावच्या यात्रेतनं भजनी मंडळाला निमंत्रण येऊ लागली. बाहेरगावची मंडळं इथं येऊन हजेरी लावू लागली.

पण हे वर्ष–दोन वर्षंच जेमतेम चाललं. इतक दृष्ट लावण्यासारखं वागणं या गावच्या स्वभावात नव्हतंच. एका भजनी मंडळाची दोन झाली. गावातल्या वाईट शक्तींनी त्याला खतपाणी घातलं. आपल्या वर्तनाने मंडळ आणि गावातलं वातावरण त्यांनी बिघडवून टाकलं.

एव्हापर्यंत टाळ गावकऱ्याच्या घरातल्या कोनाड्यात जाऊन पडले. मृदुंगावरून भांडणं झाली. दुसऱ्या मंडळाने मृदुंग आणि सतरंजी नेली. सगळा तमाशा उघड्या डोळ्यांनी पहावा लागला. त्याच रात्री वर्गणी काढून पुनः नवीन संच आणण्यात आला.

कधी नव्हे ते मिळालेल्या बक्षिसाचं वाटोळं झालं. टाळ हरवले. मृदुंगाची रवानगी कुणाच्यातरी माळ्यावर झाली. सतरंजीचे वापरून वापरून तुकडे झाले.

पुनः भजनी मंडळ जमलय. तरूणमंडळीबरोबरच वृद्धही असतात. या लिफ्टमुळे एकत्र आलेयत. ग्रामायनामुळे जे उत्साहाचे वारे संचारले त्यात भजनी मंडळपण उभं रहातंय. शिंदे टेलर त्यांना तालासुराचं ज्ञान देतात. ज्ञानेश्वर–तुकारामांचे अभंग रागदारीत, तालासुरात म्हणायला शिकवतात. लिफ्ट सुरू व्हावी यासाठी धडपडणारे हिरामण, भगवंत, आवा, शांतारामबुवा ही सर्व मंडळी रात्री भजनात दंग होतात. बबनराव हे तर तरुणांना लाजवील अशा उत्साहाने सर्वच कामात सहभागी होतात. ग्रामायनमुळे गावात जिवंतपणा येऊ लागलाय.

एक लिफ्ट, जी गावच्या विकासासाठी आली; पण गावचं गावपणच हरवून जवळजवळ बारा वर्षं बंद पडली, जन्मठेप भोगून आलेल्या कैद्याचा जसा जगाशी संबंध तुटलेला असतो, एक अंतर त्याच्यात आणि जगात पडते, तसंच या सागवीचं झालं होतं. आपलं सुख हरवून बसलेली सागवी जशी दारूत आपलं रुप न्याहाळायची तशीच तिच्या अतरंगात भजनाचे सूर घुमायचे ते कधी कधी वर उफाळून यायचे आणि दारू सोडलेल्या माणसासारखी सागवी महिना दोन महिने बुवा बनून टाळमृदुंगाच्या तालात रममाण व्हायची आणि...

...पुनः ..

येरे माझ्या मागल्या...!

ग्रामायनच्या कार्याचा शिंद्यांच्यावर चांगलाच प्रभाव पडलाय त्याच म्हणण, या तरुण मंडळींना असं नुसतं मोकळं ठेवून उपयोगी नाही. यांना धर्म नकोय, यांना देव नकोय. नुसता विकास हवाय; पण याच विकासाच्या ध्यासापोटी गावाची एक पिढी नष्ट झालीय. याच ध्यासामुळे गाव नासून गेलय. चागले धर्मसंस्कार जर नसतील तर कोरड्या तत्वज्ञानाचा काही उपयोग होत नाही. येणारी समृद्धी पेलण्याची ताकद त्या कोरड्या मनात नसल्याने गावाला ती समृद्धी पुनः बरबादीच्या वाटेवर नेईल. भजनं, भागवत सप्ताह, ज्ञानेश्वरी, गाथा इ. च्या वाचनानं मन सतत टवटवीत रहात. बाई–बाटलीकडे वळत नाही. खेड्यात इतर कोणत्याच चैनी नसल्यामुळे दारूकडे तरुण फार लवकर वळतात. त्यासाठी काहीतरी करायला हवं.

रात्र खूपच झाली होती. एवढ्या रात्रीतही नदीच्या पलिकडच्या तिरावरून विजेच्या मोटारींचा आवाज येत होता. तिथला शेतकरी रात्रपाळी करीत शेताला पाणी देतोय आणि सांगवी गाव अंधाराची कांबळ पांघरून थंडीत, अंथरूणात चिडीचूप झालय!

¤

गेले चार दिवस या गावात हिंडत असताना जे जे जाणवलं ते असं की, हे गाव विसावं शतक संपत आलय तरी अजून शतकाच्या प्रारंभातच आहे. नुकतीच वर्षं दोन वर्षांपूर्वी गावात वीज आलीय; पण अजून घरात अंधारच आहे!

विकासाच्या नावाखाली प्रचंड प्रमाणात पैशाचा ओघ ग्रामीण भागाकडे वळतो आहे. गेल्या सहा पंचवार्षिक योजनातून असे महापूर कित्येक येऊन गेले; पण आमची खेडी विकासाविना कोरडीच राहिली! विकास गंगेतलं धन कावडी भरभरून कुणी वाहून नेलं ..?

या अस्वस्थ करून सोडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे तुम्हा आम्हाला सापडतीलही.

पण ही उत्तरं म्हणजे या साठाउत्तराच्या कहाणीचा मतितार्थ नव्हे, की तोडगाही नव्हे.

मंगळवारी इथं येण्यापूर्वी 'माणूस'च्या माजगावकरांशी बोलताना ते म्हणाले होते; खेड्यातील गरीब, दलित वर्गाला आर्थिक व सामाजिक उपक्रमातून बलवान करून देऊन स्वत:च्या पायावर उभे करणे हे ग्रामायनचे कार्य आहे.'

इथं आल्यावर हरिभाऊ टेमगिरे या ग्रामायनच्या पूर्ण वेळ कार्यकर्त्यांने गेल्या दोन वर्षात जे अथक परिश्रम घेऊन या गावच्या असाध्य रोगाला नुसतेच आटोक्यात आणले नाही, तर बरीचशी सुधारणाही घडवून आणली. त्यावरून ग्रामायन संस्थेच्या दृष्टिकोनातला वेगळेपणा जाणवला.

शिवतक्रार, निमगाव म्हाळुंगी, कोरेगाव भिवर या ठिकाणच्या ग्रामायनच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आज या प्रत्येक ठिकाणी ग्रामायनचा एक पूर्णवेळ कार्यकर्ता कार्य करतोच आहे शिवाय या योजनांमधील सभासदातून तरुण कार्यकर्ते ग्रामायनचे कार्य करण्यास पुढे येत आहेत. त्यादृष्टीने झालेल्या प्रासंगिक शिबिरामधून सहकारी व्यवस्थापनाचे शिक्षण दिले जाते. तेथील तरुणांना नेतृत्वाचे प्रशिक्षण दिले जाते, पाणी वाटप, त्यातील तक्रारी सोडविण्याची पद्धत इ. कामे अनुभवाद्वारे हे तरुण शिकत असून आज असे सात कार्यकर्ते पूर्णवेळ काम पहातात.

सागवीच्या उपसा जलसिंचन योजनेची नव्याने सुरुवात करण्याचे अवघड काम ज्या तरुणाने आपल्या शिरावर घेतले, ते हरिभाऊ

टेमगिरे हे अशाच एका शिबिरातून प्रेरणा घेऊन पुढे आले.

◻

हरिभाऊ टेमगिरे पारोडी गावचा राहणारा. शेतकरी कुटुंबातला. विवाहीत. खेड्याचेच रंगरूप असणारा.

सांगवीच्या समस्येशी एकरूप झालेला. गेली दोन वर्षे सतत परिश्रम घेऊन एकाएका प्रश्नांची सोडवणूक करीत, गावाला शाप ठरलेल्या लिफ्टचे पुनरूज्जीवन करणारा !

सुरुवातीला गावातील जाणकारांच्या चेष्टेचा विषय बनलेला.

'भले भले नेते गेले. बारा वर्षात कुणाला जमलं नाय. आमदार, खासदार, समदं झालं. आन आता तुमी आले ! भले ! लिफ्टी चालू झाली तर पहिला हार मी घालीन तुमाला. सोपं नाय ते–पळून जासाल एक दिस कट्टाळून. तुमचं काम नाय ति, हृये गावच लई वंगाळ हाय...'

म्हातारे ग्यानबा लोले हरिभाऊंना म्हणाले होते. त्यांच्या स्वरात जिव्हाळा होता. काहीसा कुत्सितपणाही होता.

'सुरुवातीलाला दोन–चार दिवस पंचायतीच्या कट्ट्यावर झोपलो. कुणी ओळखीचे नाही. ज्याच्याशी बोलावं तो काढता पाय घेई. जेवायची सोय नाही. भूक लागली की पाणी प्यायचं. कधी दुकानातून गुळशेंगदाणे खाऊन राहिलो. गावात साधं चहा देणारं हॉटेल नाही. लोक लिफ्टच्या विषयावर मौन पाळून असत. ह्या त्याच्याकडे बोट करी तो ह्याच्याकडे ! कागदपत्रं कुणाकडे आहेत ? कशा प्रकारे लिफ्टचं काम चालत असे ? कोणत्या कारणाने बंद पडली, हे काहीच कुणी बोलत नसे. एकदा तर निराश होऊन मी माझं सामानसुमान आवरून तळेगावच्या वाटेला लागलो होतो. विठ्ठवाडीपर्यंत गेल्यावर मन आणखीनच उदास झालं. पराभवाच्या कल्पनेनं, आणि पावलं परत माघारी वळली.

सांगवी सांडसच्या दिशेने...

एका अनिवार इच्छेने...


अशा निराश मन:स्थितीत असतानाच त्या वेळचे तरुण सरपंच शांताराम पाबळे भेटले. त्यांच्याच सहकार्याने आणखीन दोघेजण आले. आबा, हिरामण, दत्तोबा पाबळे, दत्तू तळेकर एकएक जमत होते आणि माझ्यातील गेलेला उत्साह दुणावत होता. हरिभाऊंनी सांगितले.

◻

इथं आल्यापासून मी पहात होतो. हरिभाऊंनी निरोप पाठवायचा अवकाश की, वीसपंचवीस मिनिटाच्या अवधीत शेतावरून–घरनं, जिथे असतील तिथून लोक, हातातलं काम बाजूला ठेवून तातडीने जमत असत ! हरिभाऊ सांगतील त्याप्रमाणे करीत असत !

फक्त दोन वर्षाच्या कालावधीत असा बदल घडू शकतो ! कोणतेही वलय नसलेली संस्था, तिचा एक कार्यकर्ता, आपल्या वागणुकीने अवघड असे कार्य घडवून आणतो. अनंत अडचणींतून वाट काढत. आता तर अगदी नजरेच्या टप्प्यावर काम आलंय...!

काल हरिभाऊ पुण्याला जाऊन आले. एक दोन दिवसातच लाइटचं कनेक्शन मिळून



लिफ्ट चालू होणार असल्याची आनदाची बातमी त्यानी सागितली आणि पुढं म्हणाले,

'आजवरचा अनुभव पाहता हे वीजमंडळ शेवटच्या घटकेला काही तरी कारण पुढं करून चालढकल करील, पण आत्तापर्यंत त्यांनी सांगितलेल्या सर्वच कागदपत्रांची पूर्तता झालीय. आज दोन महिने झाले सर्व काम ओके होऊन. अनिल काळे, नामदेव माळी आणि मी, असे ग्रामायनचे आम्ही सतत हेलपाटे मारतोय. ही आज सगळी वाटुक झालेली ज्वारी हाताशी आली असती. आज नुसताच चारा होणार, त्याऐवजी प्रत्येकाच्या पदरात उत्तम ज्वारी आली असती. दहा-वीस पोती ज्वारी एकेकाला आली असती, पण साध्या वायरमनपासून तो वरच्या इंजिनियरपर्यंत कागद हलायला कोण त्रास. तिथं एकदाच सांगणार नाहीत काय हवं, नको ते. प्रत्येक अधिकाऱ्यांच्या कागदपत्राच्या मागण्या वेगळ्या. हाच कागद हवा. हेच सर्टिफिकेट हव. अमूकअमूक तारीख टाका इथं. की चाललो परत माघारी. जुनं रेकॉर्ड शोधून, मग त्या जुन्या तारखा शोधून आणायच्या. ते घेऊन जाईपर्यंत चार दिवस गेलेले असतात. मग येते एखादी सुट्टी शनिवार रविवार. मग तो तिथला कारकून जागेवर नसणार. तो भेटल्यावर, सकाळपासून संध्याकाळपर्यंत थांबल्यावर तो पुन: सांगणार हे त्या अमूक अमूक टेबलावरच्या माणसाकडे नेऊन द्या. त्याचं काम आहे हे! असं अनेक वेळा झाल. आजचच पहानं. त्या कारकूनबाईनं सागितलं, 'टेस्ट रिपोर्ट आणून द्या!'

मी म्हणालो 'अहो ते जोडलंय...'

'ते कसं चालेल आमच्या इंजिनियरचं हवं.'

'अजून लाइटच नाही. त्यामुळे टेस्टिंग कसं घेता येईल ?'

'मग परवानगी कशी देणार मी...तुम्ही साहेबाना भेटा.'

## मिनतवाऱ्या । हुज्जती

'झालं पुन: परत आहे तिथच याव मनात चरफडत. थोडी हुज्जत घालावी. मिनतवाऱ्या कराव्या. आज नामदेव माळी आणि अनिल काळे गेले तीन दिवस सतत या अधिकाऱ्यांच्या मागे लागलेत. त्यांना पटवून देण्यात यश आलं अखेर. आता त्यांचे इंजिनियर स्वत: येऊन पाहतील आणि मगच परवानगी मिळेल! त्यात उद्या शनिवार, रविवार सुट्टी, सोमवारी इलेक्शनची सुट्टी. मगळवारी ख्रिसमसची सुट्टी. म्हणजे सगळा आनदच. त्यानंतर निवडणूकीनतरचं वातावरण म्हणजे हा डिसेंबर गेलाच. कुणालाच काही वाटत नाही याचं.. शेतातली ज्वारी हातची गेली.. केवळ अशा दिरगाईमुळे ...' हरिभाऊ म्हणाले.

रात्र झाली होती. जेवणाची वेळ झाली होती. हरिभाऊंनी पंधरा दिवसापूर्वी आपल्या मंडळीना आणल होतं. त्यामुळे जेवणाची व्यवस्था त्याच्याकडेच होती. त्यापूर्वी हरिभाऊ शांतारामबुवाकडे जेवत असत. सुरुवातीच्या दिवसानतर इथले पोलीस पाटील (कै.) विनायकराव लोले यानी हरिभाऊना आपल्या घरी नेले आणि गावकऱ्याची एक मिटिंग घेऊन सर्वांना समजावून सागितले आणि हरिभाऊची जेवायची व्यवस्था एकेकाकडे एक एक दिवस झाली. त्याकरता शातारामबुवानी डबा दिला. रोज एकेकाकडून डबा भरून येऊ लागला. हरिभाऊ कामावरनं आले की, डबा खात असत. कधी कधी ज्याची पाळी असे, त्याच्याकडची मडळी डबा पाठवायला विसरत असत! कधी कधी कुणाकडे डब्यात देण्यासारख काहीच नसे. इकडे हरिभाऊचा तो दिवस उपवासाचा! न बोलता हरिभाऊ मनातच ठेवत असत. पण वरचेवर अस होऊ लागलं आणि हे बबनरावाच्या मुलाच्या-आबाच्या लक्षात आलं. त्यानी आणि हिरामण लोलेंनी मग हरिभाऊची जबाबदारी स्वीकारली. ती अगदी परवा परवापर्यंत!

जेवायला बसण्यापूर्वी हरिभाऊंचा तीन वर्षाचा मुलगा सदीप आईला मदत करीत होता. त्याने पाणी आणून ठेवले. भाकरी एकेका बशीत प्रत्येकापुढे आणून ठेवल्या.

'नामदेव माळीमुळे मी शिवतक्रार म्हाळुंगीच्या शिबिराला आलो ग्रामायनची कार्यपद्धती पाहिली. ग्रामीण भागासबंधीची त्याची योजना पाहिली. आसपासची सुरू झालेली कामे पाहिली आणि वाटू लागल आपणही हे काम कराव. आपण तर इथलेच. श्री. माजगावकर, डॉ देशपाडे, अनिल काळे यानी प्रोत्साहन दिले. वाटलं ही शहरातून खेड्याकडे कोणताही स्वार्थ मनात न ठेवता आलेली शहरी मडळी जर हे ग्रामसुधारणेचे काम करताहेत, आपण तर इथलेच, आपण हे करायलाच हवे. या भावनेने मी झपाटल्यासारखा झालो आणि कामाला सुरुवात केली पहिलं काम हे सागवीच...!'

हरिभाऊंनी सांगितलं आणि मी आश्चर्याने पहातच राहिलो

कोणताही पूर्वानुभव नसताना सांगवीसारख्या गावात राहून गावकऱ्यांना बरोबर घेऊन काम पूर्ण करणे म्हणजे तोंडच्या गप्पा नव्हेत.

'हरिभाऊ तुमची कमाल आहे हं, गावावर तुम्ही अगदी मोहिनी टाकलीत.' मी मनापासून म्हणालो.

'ग्रामायनची सर्व कमाल बघा!' हरिभाऊ पाण्याचा पेला खाली ठेवत म्हणाले. 'ग्रामायनच्या शिबिराना इथले काही तरुण आले, त्यामुळे इतर ठिकाणच्या कार्याचा परिचय झाला. सुरुवातीला या लोकांनी खूप त्रास दिला. नको ती लिफ्ट असं त्याच्याबरोबर मलाही वाटलं होत'

'सागवीचीच निवड कशी काय केलीत ?' मी मनातला प्रश्न विचारला

'त्याच काय झालं. हे गाव तसं आपणहूनच ग्रामायनकडे आलं.'

हरिभाऊंच्या सागण्यानं आश्चर्यानं मी जेवायचाच थाबलो.

'आश्चर्य वाटण्यासारखीच घटना आहे. तुम्ही पाहिलंतच इथले लोक कसे आहेत हे. फेडरेशन प्रकरणामुळे गावकरी वैतागलेच होते. त्यात शासनाने थकबाकीदार लिफ्टचे लिलाव करायचे ठरविले. जवळच्या एका गावचा लिलाव एक लाखापर्यंतचा झाला. आणि सांगवीतल्या काही मडळीना सागवीच्या लिफ्टसंबंधी अशाच प्रकारची अनाधिकृत पण खात्रीची बातमी लागली की, सागवीच्या लिफ्टचाही लिलाव करण्यात येणार असून त्याची किंमत ८० हजार येईल. हे समजल्यावर ही मंडळी तशा प्रयत्नाला लागली. गावातील एक-दोघं आणि बाहेरगावचे एक-दोघं असे मिळून हा लिलाव घ्यायचा आणि गावाला, ज्याला हवे त्याला पाणी विकत द्यायचे अशी त्याची योजना होती. याची चाहूल गावातल्या आणखी काहीजणाना लागल्यावर त्यातल्या काहीजणांनी तातडीने डेक्कन जिमखान्या-

वरील 'इडकॉम'शी संपर्क साधला. त्या संस्थेच्या अधिकाऱ्यांनी त्याना ग्रामायनकडे जायला सांगितले! कारण यापूर्वी ग्रामायनने शिवतक्रार म्हाळुंगी आणि कोरेगाव भिवरच्या बंद लिफ्ट्स चालू केल्याचे आणि त्या यशस्वीपणे चालू असल्याचे त्याना माहीत होते. मग हे शेतकरी ग्रामायनच्या ऑफिसात आले. ग्रामायनने गावचा सर्व्हे केला. गावात तीन-चार सभा झाल्या. या सभाना गावात चांगलीच गर्दी होई. त्यावेळी मी इथं आलो नव्हतो. सुरुवातीची कल्पना वेगळी होती. त्यामुळे लोकवर्गणी काढायचे ठरले. एकरी शंभर रुपये प्रमाणे दहा हजार रुपये जमा झाले. त्यात ग्रामायनने कुठल्या तरी संस्थेकडून सहकार्य घेऊन काम चालू करायचे ठरले होते. पण या लिफ्टचा पूर्वेतिहास फारच गुंतागुंतीचा होता. ग्रामायनला वाटले यासाठी संपूर्ण खर्च बराच येईल कारण तज्ज्ञानी जवळजवळ लिफ्ट चालू करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा अदाज पाच लाख रु पर्यंतचा सांगितला होता आणि हे काम इतक्या तातडीने होणारे नव्हते. त्यामुळे रेंगाळले. लोकानी आपापली वर्गणी परत घेतली. ग्रामायनकडे या गावासाठी स्वतंत्र कार्यकर्ता नव्हता. शिवाय यापूर्वीच्या गावाची कामे होतीच. त्यामुळे हे काम थोडे मागे पडले जमलेले संघटन परत विस्कळीत झाले. यानंतर थोड्याच दिवसात ग्रामायनतर्फे मी इथं आलो

एव्हापर्यंत आमची जेवण आटपली होती. बाहेर थंडी कडाक्याची पडली होती. अगदी कुडकुडायला होत होतं. माजगावकरानी गरम कपडे स्वेटर वगैरे न्यायची आठवण आवर्जून केल्यामुळे माझ्याकडे स्वेटर, मफलर होता. नाहीतर हालच झाले असते

चादरी अंगावर लपेटून एक एकजण येऊ लागला. आम्ही परत लिफ्ट पुराणात गुंतलो.

'गावगाड्यात वेगवेगळ्या प्रकारची माणस असतात. कोणत्या कारणाने कुणाचं बिनसेल काही सांगता यायच नाही नकारात्मक भूमिकेवर सर्वांची एकजूट असायची! एकदोघानी नकार घंटा वाजविली की सगळ्यांच्या माना हलायच्या, हरिभाऊ सांगू लागले.

'एकीकडे नामदेव माळी, दुसरीकडे अनिल काळे *आणि सांगवीसांडसमध्ये मी असे तिघे*जण कामाला लागलो.'

¤

मला ग्रामायनच्या कार्यालयातील प्रसंग आठवला. सहज जुन्या फाईली चाळता चाळता सुरुवातीच्या सभेचे वर्णन वाचायला मिळाले होते.

१२-१२-८२

– नामदेव माळी

९-१२-८२ रोजी सांगवी साडसची लिफ्टची पुनरुज्जीवनासबंधीची बैठक सायं. ७ वा झाली. कंदिलाच्या प्रकाशात शाळेच्या खोलीत सभेला सुरुवात झाली. सभेसाठी श्री. ग. माजगावकर, अनिल काळे, अब्दुल रहिम महा बँक पुणे इ. पुण्याहून आले. हरि टेमगिरे पण आला. गावातील सुमारे साठ लोक होते प्राथमिक खर्चापोटी एकरी दहा रुपये काढायचे ठरले. पहिल्या बैठकीत ६५० रु. जमा झाले!

¤

शेतकऱ्याचा ग्रामायनकडे रितसर अर्ज *आला. त्यात ग्रामायनने सांगवी साडसच्या* बंद लिफ्टला सहकार्य करावे अशी विनंती गावकऱ्यातर्फे करण्यात आली होती. त्याचप्रमाणे जुनी चालक संस्था 'हवेली तालुका लिफ्ट इरिगेशन फेडरेशन ता. हवेली'च्या संचालकाच्या नावेही अर्ज गेला त्यात ग्रामस्थांनी असे म्हटले, (३-१२-८२)

'लिफ्ट १॥ वर्षे चालू होऊन बंद पडलेली आहे आजतागायत पुन: ती चालू व्हावी यासाठी प्रयत्न झाला नाही. आम्ही ग्रामस्थांनी 'ग्रामायन'च्या सहकार्याने सदर योजना पुन्हा सुरू करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी मूळ प्लॅन, इस्टिमेट (एल सेक्शन) पाणी परवानगीची नक्कल इ. ची गरज आहे...'

¤

फेडरेशनशी कार्यालयीन पत्रव्यवहार सुरू झाला प्रत्येक गोष्टीसाठी दहादहा वेळा चकरा माराव्या लागल्या. पण चिकाटी न सोडता काम करायचे असे ठरवूनच न चिडता न संतापता काम सुरू होते. गावकरी, फेडरेशनचे अधिकारी, सरकारी अधिकारी आणि जुने कागदपत्र याच्यातून थोडे थोडे तुकड्या तुकड्याने सत्य समजत होते आणि लिफ्टच्या भावी वाटचालीस आपोआपच मार्गदर्शन होत होते. शासकीय स्तरावरील कामाचा अनुभव हा सामाजिक कार्यकर्त्यांचा खरा वस्तुपाठच असतो.

¤

हरिभाऊ एक एक शेतकऱ्याकडे जात असे, त्याला त्याची माहिती विचारून लिफ्टच्या नूतनीकरणाबरोबरच त्याच्या अडीअडचणी बाबत विचार होई. सुरुवातीला मच्छिंद्र रावसाहेब तळेकर हे मुख्य प्रवर्तक होते. हिरामण लोले, शांताराम लोले, आबा, साहेबराव लोले, किसनराव लोले हे गावकऱ्यांच्या वतीने सर्वत्र भाग घेत असत. हळू हळू एकएक जुना सभासद येऊ लागला. गावकरी जागे होऊ लागले. त्याना वाटू लागलं आता काहीतरी होणार. आतापर्यंतच्या लोकात आणि ग्रामायनच्या कार्यकर्त्यात फरक आहे ग्रामायनच्या कार्यकर्त्याचे बोलणे आर्जवी, मृदू आहे समजावणीचे आहे. वागणे साधे आहे. तो आपल्यातच जेवतो आपल्यातच रहातो. त्याला कोंबडी लागत नाही. बाटली लागत नाही.

*पूर्वी गावात कुणी आलं की ऑर्डरच सुटे,* आणि मग त्या अधिकाऱ्याबरोबरच गावकरी पण कोंबडीच्या रस्स्यावर तुटून पडत आणि वर बाटली मारून झिंगून पडत. मग सकाळी उठून अधिकारी निघून जात असत. बस एवढेच काम. प्रश्न आहे तियेच असे.

कोंबडी खाणे! दारू पिणे!

आता सगळंच वेगळं झालय. हा ग्रामायनचा कार्यकर्ता खातो कमी, उपाशीसुद्धा रहातो. याचा कोणता बडेजाव नाही. दहा दहा वेळा एकेकाला पटविण्यासाठी जावूनसुद्धा परत हसतमुख. मग आपण याच्यामागे जायचं नाही तर काय उपयोग ?

दारी चालून आलेलं भाग्य लाथाडल्यावर कोण विचारणार आहे या गावाला परत...

¤

हरिभाऊंच्या कामात हळूहळू प्रगती होत होती.

एक एक सभासदाची माहिती जमा होत होती. त्याच्या शेतातील पिकाची माहिती होत होती. त्याला कोणत्या गोष्टीची आवश्यकता आहे हे समजत होते.

बारावर्षातील चिकटलेला आळस, दुर्गुण यातून सांगवीचा शेतकरी हळू हळू बाहेर पडत होता. अजूनही त्याला कसलीशी भीती वाटत होती. तो झोकून दिल्यासारखा

कामाला लागत नव्हता. त्याच्या मनावर सतत दडपण होते. काही हितशत्रु त्या भीतीला खतपाणी घालत असत.

बँक ऑफ इंडियाच्या कर्जवसुलीला शासन केव्हाही सुरुवात करेल आणि मग त्यासाठी जमिनीचे लिलाव होतील. जर लिफ्ट सुरू झाली तर ही कर्जवसुली लगेचच होईल आणि मग पैसा आणणार कुठून ? मूळच्या साडेतीन लाख रुपयाचे आता व्याजासहित अकरा लाख रुपये झालेले. सगळा गाव धुवून जाईल. आहे ही उपाशीपोटी अर्धी भाकरी-पण हातची जाईल.

नको ती लिफ्ट...

अशी निराशेची लहर गावावर मधूनच येई आणि मग हरिभाऊ पुन: एकेकाला भेटत त्यांचे गैरसमज दूर करून त्यांच्या मनातील भीती दूर करीत.

¤

ग्रामस्थांच्या सहीने एक ठराव झाला आणि नव्या नावाचे लिफ्टचे बारसे झाले. पूर्वी चालक-पालक सर्व काही फेडरेशन होते. तर आता सर्व काही ग्रामस्थांच्याच हातात. सहकारी सोसायटी करायची, गावातलेच सभासद. ग्रामायनचे फक्त मार्गदर्शन.

हळूहळू गावकऱ्यांमध्ये उत्साह येऊ लागला. हेलपाटे घालाव्या लागणाऱ्या ठिकाणी वेळात वेळ काढून चार दोघ जण हरिभाऊबरोबर येऊ लागले.

हिरामण भगवत लोले आणि आबा ऊर्फ शांताराम बबनराव लोले ही जोडी खांद्याला खांदा लावून कामाला लागली. हरिभाऊंच्या बरोबर पडेल ते काम करायची तयारी ठेवून यांनी लिफ्टची धुरा खांद्यावर घेतली. त्यांच्या मदतीला किसन विठ्ठल लोले, दत्तू सोनबा तळेकर आले. रामचद्र ऊर्फ बाळासाहेब लोले आले. बबन गोविंदराव पाबळे आले. यानी आपल्याकडची जुनी माहिती, रेकॉर्ड हरिभाऊंना दाखवल. हरिभाऊ एकेकाला कामाला लावत होते जुने राग भाडणं विसरून एक एक जण येत होता. अडचणीतून मार्ग काढीत काम एक एक पल्ला गाठत होतं.

¤

अखेर चारपाच सभासदांची जुळवाजुळव करून हरिभाऊंनी लिफ्ट प्रकरण तयार केले. लिफ्टचे नवीन नाव ठरले. 'नवजीवन सहकारी उपसा जलसिचन योजना, सांगवी सांडस' या नावाने नवीन कागदपत्र तयार होऊ लागली.

प्रथम अडुसष्ट शेतकरी सभासद नव्या कर्जात भाग घ्यायला तयार होते. त्यांच्यापैकी त्रेपन्न जणांच्या सहीने पाणी परवानगीसाठी अर्ज करण्यात आला. सर्वांचे नवीन सातबारा काढून घेतले. या सातबाराच्या उताऱ्यापासूनच अडवणूक सुरू झाली. २-४ दिवसाच्या कामास २ महिने लागले. कामाला वेळ लागला तरी चालेल पण पावतीशिवाय कुठंच पैसे द्यायचे नाहीत, हे धोरण.

जुन्या सभासदांना नवे सभासदत्व देताना एकरी दहा रुपये जे सभासद वर्गणी देतील त्यांनाच सभासदत्व दिले. त्यासाठी खूप हिंडावे लागले.

त्रेपन्न जणांच्या सह्यांनी पाणी परवानगी साठी अर्ज केला. पुणे पाटबंधारे विभागाकडे, त्याना आवश्यक असणाऱ्या सर्व कागदपत्रांच्या पूर्ततेसह प्रकरण पाठविले. सतत आठ महिने हेलपाटे घातल्यावर पुण्याच्या कार्यालयाकडून सागण्यात आले, भीमा नदीवर आता फक्त खरिपाची परवानगी दिली जाईल. आठमाहीही मिळणार नाही ती हवी असेल तर बंधाऱ्यावरील परवानगीसाठी लघुपाटबंधारे विभागाकडे अर्ज करा-त्यासाठी नारायणगावला अर्ज द्यायला हवा.

आठ महिने वाट पाहून, सतत हेलपाटे मारल्यावर, हे उत्तर यावे यावरून या खात्यातील कर्मचाऱ्यांना आपल्या क्षेत्राची माहिती किती असेल याची कल्पनाच केलेली बरी.

आधी तलाठ्याने दोन महिने घेतले आता इथं आठ महिने गेले !

चरफडत पुन: नारायणगावच्या कार्यालयात अर्ज नेऊन दिला. यामध्ये ती कागदपत्र परत मिळविण्यात चार महिने गेले ! अखेर सतत हेलपाटे घातल्यानतर, जवळजवळ कामाला सुरुवात केल्यानतर एकूण एक वर्षाने पाणी परवानगी मिळाली ! दोन हंगाम वाया गेले.

### केवळ हेलपाट्यामध्ये शासकीय गोंधळात... वेळ आणि पैसा वाया गेला

पण अखेर एक पैसाही न देता सातशे एकर जमिनीची पाणी परवानगी मिळविण्यात आली.

ज्या कामाला 'आठ दिवस लागायचे त्या कामालाच जवळजवळ वर्ष लागले.

भ्रष्टाचारी, वेळ काढणारी यंत्रणा अशिक्षित अडाणी जनतेला किती लुटत असेल कल्पना करवत नाही !

जे काम कागदपत्र पाहून दोन दिवसात व्हायचं त्या कामाला जर दोन महिने लागले तर का नाही त्या योजनांवरचे खर्च दुप्पट होणार ?

¤

पाणी परवानगीनंतर लिफ्टच्या दुरुस्तीचे इस्टिमेट करण्यात आले. लोहगावच्या सत तुकाराम कृषि सेवा सस्था या संस्थेने इस्टिमेट तयार करून दिले. सुमारे साडेचार लाख रुपये. हे इस्टिमेट करून देणे हे एक प्रकरणच असते.

एकंदर या इस्टिमेट प्रकरणात ज्यावेळी बँकेनेच काटछाट लावली त्यावेळी लक्षात आलं की, सर्वसाधारणपणे इस्टिमेट हे वाढिवच असते !

इस्टिमेट आल्यावर जो खर्च मजूर लावून करण्याचा दाखविला होता त्या ठिकाणी गावकऱ्यानी श्रमदान करण्याचे ठरले आणि २५ टक्के रक्कम त्या श्रमदानरूपाने दाखवायची ठरली. कारण शेतकऱ्याचे पंचवीस टक्के भरल्यावर बँक पैसे देणार होती.

पाणी परवानगी आणि एस्टिमेट आल्यावर. बँक ऑफ महाराष्ट्र, तळेगाव ढमढेरे यांना भेटून सर्व परिस्थितीची कल्पना देण्यात आली सागवीच्या पहिल्या सभेत पुण्याहून बँक ऑफ महाराष्ट्रचे एक अधिकारी आले होतेच. त्यामुळे बँक ऑफ महाराष्ट्रने एक महिन्यात कर्ज मंजूर करू म्हणून सांगितले. हरिभाऊ-हिरामण उत्साहाने कामाला लागले.

अनिल काळे-नामदेव माळी पुण्यातली कामे पहात होते. आणि मग अडुसष्ट शेतकऱ्यांचे अर्ज बँकेला दिले गेले. त्यात ज्याच्यावर भूविकास बँकेची पहिली कर्जे होती अशांचे अर्ज बँकेने रद्द केले.

शेतकऱ्यांची जेवढी जमीन आहे त्या सर्व जमिनीचे गहाणखत करण्याच्या अटीने परत खळबळ माजली. बँक अधिकाऱ्याचे म्हणणे शेतकऱ्याने जर सर्व जमिनीचे गहाणखत नाही केले तर शेतकरी दुसऱ्याही बँकांकडून कर्ज उचलतो आणि ते आम्हाला समजत

नाही. त्यापेक्षा शेतकऱ्यालाही नतरही लागले पैसे तर आम्ही देऊ. बियाणे, खते यासाठी. पण सर्वच जमीन गहाण हवी.

यामुळे अडुसस्टमधले अखेर एकावन्न जण राहिले. त्यांची गहाण खते तयार करण्याचे ठरले. लोकांच्या मनात गहाणखतासंबंधी भीती असल्यामुळे लोकाच्या मानसिक तयारीत पुन: वेळ गेला.

अशा परिस्थितीत एक्कावन्न शेतकऱ्यांची प्रकरणे बँकेने मंजूर केली.

आणि मग गहाणखत करून घेणाऱ्या अधिकाऱ्याने फार त्रास दिला.

हे गहाणखत प्रकरण म्हणजे एक प्रकारे चराऊ कुरणच असते! कोणत्याही अयोग्य कारणासाठी हे काम अडवतात. आणि अडचणीत पकडून पैसे उकळतात. फी सांगतानाच कारकून वरचे पैसे धरूनच फी सांगतो. अर्थातच वरच्या पैशांची पावती मिळत नाही हे सागायला नको.

आधीच या गोंधळात आणखीन दोन महिने गेले. पिकं तर तोंडावर आलेली. गहाणखते प्रत्येकाशी स्वतंत्र करावी लागतात.

गहाणखत अधिकाऱ्याने सागितले फक्त दर बुधवारीच गहाणखते होतील. तीही एक वेळ सातच होतील!

सर्व जण हबकलेच. आठवड्याला सात म्हणजे एक्कावन्न जणाचे काम पूर्ण व्हायला सात आठवडे म्हणजे जवळजवळ दोन महिने लागणार!

शुद्ध अडवणूक होती. दाम दाखविल्याशिवाय काम नाही. दाम दाखविल्यावर हातातली सर्व महत्त्वाची कामे बाजूला ठेवून हे काम अग्रक्रमाने करतात.

एक–दोन सभासदाना बरोबर घेऊन हरिभाऊ तहसिलदाराना भेटले. सागवी साडसची सर्व अडचण त्यांना समजावून सागितली. ग्रामायनचा त्यातला सहभाग सांगितला. तहसिलदारांनी रजिस्ट्रारला बोलावून घेतले आणि सर्व गहाणखते त्वरित करून घ्यायला सागितले.

अखेर गहाणखते झाली.

सर्वांची गहाणखते आणि इतर कागदपत्रे अशी एकत्र करून बँकेत उत्साहाने सर्वजण गेले. पाणी अगदी दृष्टोत्पत्तीस आले!

### मुंबईच्या फेऱ्या

आणि पुन: एक मोठी पर्वताएवढी अडचण उभी राहिली!

अडचणी संपत नव्हत्या. अडथळे वाढत होते. तसतशी हरिभाऊची जिद्द वाढत होती आणि शेतकऱ्यांच्या मनात शंकेची पाल चुकचुकत होती. आत्तापर्यंतच्या अडथळ्यांच्या शर्यतीत हा अडथळा मोठा होता.

बँकेच्या अधिकाऱ्यांनी 'सरकारी परवानगी' आणल्याशिवाय कर्ज देता येणार नाही असे सांगितले.

आणि सागवी सांडसची लिफ्ट पुन: एकदा अधांतरी लटकू लागली. समोर अथांग पाणी दिसत असूनही मृगजळाप्रमाणे ते भासमान वाटू लागले. शेतकरी चिंतेत पडले. दीड वर्ष आशेनं कसून पाठपुरावा करून भगिरथ प्रयत्नाने आणलेली ही गंगा सांगवीकराच्या ओंजळीत अखेर केव्हा पडणार? ही पाण्यासाठीची तडफड केव्हा संपणार...?

लोकाची कामे कशी भराभर होतात. आपल्या सांगवीकरांचंच असं का? किती अडचणीतून आपण मार्ग काढला, कधी एकत्र येणं माहीत नव्हतं ते आलो आणि आता ही नवीन अडचण ...... सरकारी परवानगीची!

सरकारी परवानगीच काय सरकारी कोणतेही काम हे किती अवघड असते हे अनुभवाला आलेच होते.

ही सरकारी परवानगी एवढ्याचसाठी की पूर्वीचा कर्जाचा बोजा असताना हे नवीन कर्ज द्यायचे, तर त्याच्या वसूलीमध्ये अग्रक्रम बँकेचा असावा. नाही तर उद्या हे सर्व पैसे दिल्यावर शासन पूर्वीच्या कर्जापोटी वसुली करेल. लिफ्टवर ताबा घेईल.

पण ग्रामायनने ही लिफ्ट कोणत्याही संकटाला तोंड देऊन सुरू करायचीच असा जणू विडाच उचलला होता!

सरकारी परवानगी हे प्रकरण तलाठ्यापासून सर्कल, मग तहसिलदार, नतर जिल्हाधिकारी अशी एक उतरंड. या उतरंडीला जोडीला आमदार, खासदार, मंत्री अशी दुसरी उतरंड. पहिल्याउतरडीत कोणाच्या हातात ही परवानगी देण्याचे अधिकार आहेत हे समजण्यासाठीच अनिल काळे, नामदेव माळी यांच्यापासून हरिभाऊपर्यंत अनेक कार्यकर्त्यांनी असंख्य हेलपाटे मारले. अखेर जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, सचिवालयातून यासाठी खास परवानगी आणावी लागेल. मग पुन: मुबईच्या फेऱ्या सुरू झाल्या. अनिल काळेंनी त्यासाठी मुबईला तीन–चार फेऱ्या मारल्या, पण हे प्रकरण खूपच अवघड होऊन बसलेले. कुणीही स्वत:च्या अधिकारात परवानगी देण्यास धजत नव्हता आणि हे परवानगी प्रकरण पुढे सरकेना. ओठापर्यंत आलेला घास खाली पडतोय की काय असे वाटू लागले. अधिकाऱ्यांच्या प्रत्येक पायरीवर भेटीसाठी अतोनात कष्ट घ्यावे लागतात. जाण्यायेण्यात पैसा खर्च होतो. वेळ वाया जातो.

पण काही इलाज नव्हता. काय वाटेल ते झालं तरी जिद्द सोडायची नाही असं ठरलं होतं.

ग्रामायनचे अध्यक्ष डॉ. व. द. देशपांडे, कोषाध्यक्ष आणि 'माणूस' चे संपादक श्री. ग. माजगावकर, सचिव अनिल काळे हे महाबँकेच्या चेअरमनना भेटण्यासाठी गेले. सांगवीसाडसच्या लिफ्ट प्रकरणाची संपूर्ण माहिती त्यांना दिली. त्यांना अखेर पटवून देण्यात ग्रामायनच्या कार्यकर्त्यांना यश आलं. चेअरमननी स्वत:च्या अधिकारात आगोदरच मजूर झालेल्या कर्जाचे प्रत्यक्ष पैसे देण्यास मान्यता दिली.

आणि सर्वांनी निश्वास सोडला. इथवरचा प्रवास खडतर झाला; पण अखेर प्रयत्नाना यश आले. एक लढा जिंकला. गेली बारा वर्षे ज्या एक ओझ्याखाली सारा गाव दडपून गेला होता त्यात त्याला थोडीशी उसत मिळाली. आता खरोखरच शेतांना पाणी मिळणार होते.

साऱ्या गावात आनंदीआनद पसरला. चेअरमननी साखर आणून वाटली. हरिभाऊंनी गेली दोन वर्षे सतत अथकपणे जे प्रयत्न केले त्याला यश आले.

¤

आता दुसरा लढा सुरू झाला होता.

गावकऱ्याच्याबरोबरचा, गावकऱ्याचाच! त्यांना आता नव्या मार्गावरून घेऊन जाण्याचे कार्य करायचे होते. ही आवळ्या भोपळ्याची मोट बांधायची होती. विविध प्रकारची, विविध स्वभावाची माणसे एकत्र घेऊन जायची होती. काही विघ्नसंतोषी मंडळी कार्यात विघ्न आणण्यासाठी टपलेली असतात.

संध्याकाळी सर्वांनी मिळून उद्याचा कार्यक्रम ठरवावा. कामे वाटून घ्यावीत, सकाळी उठून वाट पहावी तर पुन: काही तरी बिनसलेलं असे. कुणाच्या तरी डोक्यातून घरी जाता जाता काही तरी शंका निघे आणि त्या शकेनंच मनात घर् केले जाई. मग पुन: हरिभाऊंनी एकेकाला भेटून त्यांची समजूत काढावी आणि एकेकाला घराबाहेर काढावं !

बँकेत कागदपत्रांवर सह्या करण्यासाठी जायचा दिवस उजाडला.

आणि शेतकऱ्यामध्ये पुन: चलबिचल माजली.

ह्या आला तर तो नाही. असा पाठशिवणीचा खेळ सुरू झाला.

प्रत्येकाच्या मनात भीती. पूर्वीचं कर्ज. त्यात हे नवीन कर्ज. पुन: जर लिफ्ट बद पडली तर ? आहे ह्या कर्जानेच आपली एक पिढी सुख हरवून बसली. आपल्या पोराबाळांच्या तोंडचा हा अर्धामुर्धा घास पण जायचा.

नको ती लिफ्ट...

नको ते पाणी...

आजवर नाही का जगलो...

जगू असेच. कष्ट करू...पण आता अधिक कर्ज नको. आता ताकद नाही राहिली मनगटात...

पण आबा–हिरामण, बबनराव, सरपंच शितोळे, हरिभाऊ यांनी कंबर खचू न देता पुन: एकेकाला समजावलं. अखेर जो सभासद हाताला लागेल त्याला घेऊन तळेगावच्याच रस्त्याला धरणावर पुढे पाठवून द्यायचं. आबानं त्याला धीर द्यायचा आणि आपल्या ताब्यात घ्यायचं. असे प्रथम पंधरावीसजण जमले. काही मागून मजा पहात येत होते. अखेर ते पण यांच्यात सामील झाले. बँकेत जाईपर्यंत चाळीस सभासद झाले होते !

काय होतंय हे तर पाहूया, झालं यशस्वी तर होऊ त्यात सामील. नाहीच झालं तर आहे ते टिकवण्यात शहाणे ठरू. असा धूर्त विचार करून काहीजण मागे राहिले. काहींनी सभासद फोडण्याचा प्रयत्न केला.

पण शांताराम लोले, हिरामण लोले, दत्तू सोनवा तळेकर, असू कांवळे, किसन विठ्ठल लोले या गावकऱ्यांनी एकी भक्कम राखून सुरुवातीपासून मनावर घेऊन कसून प्रयत्न केले आणि गावकऱ्यांची एकी राखली. यांच्या नसानसात आज ग्रामायन सचारले असून यांच्या उत्साहावरच, निष्कपट काम करण्याच्या पद्धतीवरच ही लिफ्ट पुढेही सुरू रहाणार आहे.

या दोन वर्षांच्या अनुभवातून एक लक्षात आले. शासन यंत्रणा जरी भ्रष्ट असली, तसा अनुभव पदोपदी येत असला तरी, आपण जर सत्याला धरून राहिलो, प्रयत्न केला तर हीच माणसे–जी सुरुवातीला विरोध करीत असतात, तिच पुढे चांगले सहकार्य देतात.

माणसाच्या मनातली सद्सद्विवेकबुद्धी जागृत करून माणसाच्या माणूसपणाला हात घालायचा, माणसातल्या चांगुलपणाला साद घालायची की, माणसातला माणूस आपोआपच जागा होतो.

¤

बँकेच्या कागदपत्रांवर सह्या झाल्या एकूण चाळीसजणांच्या आणि कामास गती आली. गावात सर्वांच्यात उत्साह संचारला. शेतकऱ्यांचा चौथाई वाटा श्रमदानाने भरून काढायचा होता. हौदातला गाळ काढणे, पाटाची दुरुस्ती, फुटके पाईप काढून नवीन टाकणे, चारीत उगवलेली वेडी बाभळ तोडणे, ताली दगडमातीने भरणे इ. कामे जवळ जवळ दीड महिना श्रमदानाने केली. सर्वांची हजेरी ठेवण्यात आली. जो गैरहजर राहील त्याला पंधरा रुपये दिवसाला दंड आकारण्यात आला. त्याप्रमाणे अनेकांकडून तसा वसूलही करण्यात आला.

पंधरा–सोळा वर्षांपूर्वी बांधलेली व्यवस्था पूर्ण मोडकळीस आलेली होती. त्यामुळे दुरुस्ती शेतकऱ्यांनी एकजुटीने श्रमदानाने केली. श्रमदानाने केलेले काम चाळीस हजार रुपयांचे झाले.

ज्या दुरुस्तीसाठी एस्टिमेटमध्ये मोठा खर्च धरला होता, त्यात खूप बचत झाली. हा एक सुखद धक्का. ग्रामायनचे अनुभवी वायरमन श्री. म्हस्के यांनी या कामी मोलाचे सहकार्य केले.

## २३ डिसेंबर १९८४

तीन दिवसांच्या अथक परिश्रमानंतर नामदेव माळींनी वीजमंडळाची लेखी परवानगी मिळविली. अनिल काळे आणि नामदेवनी त्याकरता कार्यालयांना चार दिवस सुट्टया असल्याने अधिकाऱ्यांच्या घरी हेलपाटे मारले. नामदेव ती परवानगी घेऊन पुण्यावरून वीजमंडळाच्या एक एक अधिकाऱ्याला दाखवून, अखेर तळेगाव ढमढेरे येथील वायरमनला पुढे घालून घेऊन आले. एकएक दिवसानं जसं कॅन्सरच्या रोग्याचं आयुष्य कमी कमी होत जातं त्याप्रमाणे पाण्याअभावी पिकांच झालं होतं. गेला महिनाभर अक्षरश: रोज वीज कनेक्शन मिळणार म्हणून गाजत होतं. अनंत अडचणी उभ्या राहिल्या. तितक्याच जबर इच्छेने कार्यकर्त्यांनी कामे केली.

शासन यंत्रणेतील दिरंगाई हेच खरं तर दुर्दशेचे मूळ कारण. पिके जळाली काय किंवा तिकडे शेतकरी मेला तरी यांचे त्या कागदपत्रांवरचे निर्णय कधीच वेळेवर होत नसत. त्याची त्याना पर्वा नाही.

ग्रामायनच्या आजवरच्या सर्व प्रकरणातील सर्वांत अधिक कटकटीची जीवापाड मेहनत घेऊन उभी राहिलेली योजना अखेर साकार झाली !

रविवार... सांगवी सांडसच्या शिवारातनं पाणी खेळू लागलं. जवळ जवळ बारा वर्षांचा वनवास सपून ग्रामायनच्या रूपाने भगिरथच अवतरला आणि भीमा शिवारातनं खेळू लागली.

सांगवी सांडसच्या चेहऱ्यावरचे लोपलेलं स्मित पुन: विलसू लागलंय. जो तो हातातले काम सोडून शेताकडे धावतोय...!

लिफ्ट चालू झाली...

पाणी आलं...!


पाणी आलं...

जणू गंगाच आलीय...!

इतके दिवस आळसावलेला गाव झटून कामाला लागलाय. लहान मुलांपासून वृद्धापर्यंत सर्वजण शेतात पाण्याच्याच मागे आहेत. पाणी हळूहळू पाईपमधून वर जातंय. बारा वर्षं तहानेन पाटाच्याच शिरा कोरड्या पडल्या होत्या, त्याची तहान शमून पाणी शेतातनं जावू लागलंय.

पाईपमधून पाणी हौदात येण्यापूर्वी सर्वजण हौदाच्या कठड्यावर पाण्याची वाट पहात उभे राहिले.

पाईपमध्ये गेली बारा वर्षं वस्ती करून असणारी वटवाघुळं पंखांचे फडफड आवाज



करीत शेकड्यांनी बाहेर आली! सारा आसमंत त्यांच्या फडफडण्याने झाकोळून गेला. त्यांच्या त्या फडफडणाऱ्या काळ्या आकृत्या हळूहळू उडत उडत निवाऱ्याच्या शोधात दूर गेल्या. जणू त्यांना सांगायचं होतं 'आता आमचं येथे काम नाही. उलट्या जगात वावरणारे आम्ही. गाव आता जागं झालंय. आता उजाडलंय. आम्हाला इथून निघायला हवं. आम्ही अंधाराचे सोबती...!'

वटवाघुळाच्या रूपानं गेल्या बारा वर्षांतील आळस, दुर्गुण निघून गेले. गावकरी कामाला लागले.

ग्रामायनच्या दृष्टीनं एक पाऊल पुढे पडलं. विकासाच्या मार्गावरील एक आजारी गाव हळूहळू विकासाच्याच मार्गावर येईल.

## २४ डिसेंबर १९८४

गेल्या सहा दिवसात गावाच्या अंतरंगात शिरलो. गेल्या काही वर्षांचा इतिहास लोकांच्या बोलण्यातून उभा राहिला. आज पाणी आले म्हणून गावातल्या दलित समाजात हिंडून त्यांच्या प्रतिक्रिया ऐकाव्यात असे वाटले. या गावात पाणवठा एकच आहे. लोक सर्वच समारंभाला एकत्र येतात. सामाजिक तणाव नाहीत. सर्वच समाज एका विलक्षण अडचणीतून जात होता, त्यामुळे या सामाजिक दुर्गुणांची लागण इथं विशेष झाली नाही. आज या स्थितीतून गाव एका नव्या युगात प्रवेश करीत असताना नव्या जाणिवा घेऊनच गावातील ग्रामस्थ एकत्र येत आहेत.

गेल्या सहा पंचवार्षिक योजनांचा कुठलाच मागमूस गावात दिसत नव्हता. गावाला त्याचं काही वाटत नव्हतं. पुढाऱ्यांना आवश्यकता नव्हती. 'विकासाची गंगा शेतकऱ्याच्या दारात' अशी जाहिरात करणाऱ्या शासनाच्या यादीत अशी कित्येक खेडी आहेत की जिथं प्यायला पाणी नसतं उन्हाळ्यात? याही खेड्याची उन्हाळ्यात पाण्यासाठी दाही दिशा अशी अवस्था होते. पावसाळ्यात दुथडी भरून वहाणारी नदी. तर उन्हाळ्यात पाण्याचा टिपूस नाही. नदीच्या पात्रात पिंप पुरून काही दिवस पाणी मिळतं; पण ते गावाला पुरत नाही.

बोलता बोलता काल बबनराव लोले म्हणाले होते. 'आमचं गाव कसंही असो पण इथं जातीयता नाही. गावात पाणवठा एकच आहे!'

माझी पावलं आपोआपच हरिजन वस्तीकडे वळली. गावच्या मधून रस्ता जातो. रस्त्याला लागूनच हरिजन वस्ती आहे. वस्तीत शिरता शिरता रस्त्याला लागून एक बांधकाम चाललं होतं. शासनाच्या अनुदानातून मागासवर्गीयांसाठी धार्मिक तसेच सामाजिक कार्यासाठी 'समाज मंदिर' बांधलं जात होतं

दलितांच्या बाबतीत हे गाव सहिष्णू, तसेच उदारमतवादी दिसले.

बाबू गंगाराम कांबळे हे इथले रहिवासी शेतकरी. यांची चार एकर जमीन लिफ्टखाली भिजणार आहे. पूर्वी ग्रामपंचायतीत सभासद होते.

'गावात फार पूर्वीपासूनच एकीचं वातावरण आहे. वीस एक वर्षापासून एकाच पाणवठ्यावर आम्ही पाणी भरतोय. झालंस तर देवळात जातो पर कुनी आडवत नाय. गावातल्या लग्नकार्यात आम्हा सर्वांस्नी बोलावणं असतं. एरवी आमी उठतो बसतो. पूर्वी ताटं आमची आमाला घासाय लागायची, आता तसं काय बी नाय. गावकरीबी वस्तीत येतात जेवत्यात. गावात आठवतंय तवापासून जातीवरनं भांडणं नाहीत. आमच्यातच किरकोळ हुत्यात. आमच्यात एकी नाही. अडीअडचणीला कुणी एकत्र येत नाहीत.'

कांबळे यांची शेती लिफ्टखाली प्रथम येते त्यामुळे आता बागाईत करायचा विचार त्यांनी बोलून दाखवला.

'पण औजारं नाहीत. गावकऱ्यांच्या सहकार्यात होईल. शिवाय ग्रामायनबी सहकार्य करणार म्हणालेय. पाणी आलं तरी खतांचा खर्च झेपणार नाही. भूईमूग करायचा विचार आहे.'

'या वर्षीच्या पिकामध्ये दहा एकरात ज्वारी बाजरी केली होती. अर्धं पोतं धान्य हातात आलं नाही. मोलमजुरी करूनच आजवर जगलो. थोडा काळ मुंबईत हमाली केली.'

समाज मंदिराचा उपयोग दलितांच्या धर्मकार्यासाठी करणार असल्याचं त्यांच्या बोलण्यात आलं. त्यात जयंत्या–पुण्यतिथ्यां-

सारखे कार्यक्रम घेण्यात येतील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या बरोबरच त्या काळात यानी बौद्धधर्माचा स्वीकार केला, तरीही देव–देवस्की, देवीची पूजाअर्चा सर्व-जण करतात. गेल्या वीस–पंचवीस–तीस वर्षात कोणीही दलित पुढारी गावात फिरक-लेला नाही.

पुढाऱ्यांमुळे गावात दुही माजेल यामुळे ही मंडळीसुद्धा कुणा पुढाऱ्याकडे गेली नाहीत. उलट ग्रामस्थांशीच चर्चा, सल्लामसलत करून प्रश्न सोडवतात.

ग्रामायनने शेतीसाठी लागणारी अवजारं भाड्याने पुरवावीत म्हणजे या पाण्याचा काही उपयोग होईल, असे त्यांना वाटते. मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत गावाबरोबरच इथही तिच परिस्थिती आहे. मुलांनी शाळा सोडल्यात, मुली मात्र विठ्ठलवाडीला शाळेत जातात. अद्यापपर्यंत अकरावीच्या पुढं कुणी गेलेलं नाही. या वर्षी दोन मुली आणि एक मुलगा दहावीत आहेत.

जुनं उगाळित बसण्यात आता काही अर्थ नाही, असं त्यांचं म्हणणं पडलं. एक विशेष-त्वानं जाणवलं, या गप्पांमध्ये इथल्या महि-लांनीपण भाग घेतला. ब्राह्मण आणि दलित समाजातील महिला मोकळेपणाने बोलल्या.

भारतात खेडोपाडी सर्वत्र दलितांवरील अत्याचाराच्या बातम्या येत असताना इथला हा अनुभव वेगळा होता.

¤

येथील पोलीसपाटील दलित समाजातील असून तरुण आहेत. कुमार किसन गजरे.

जमिनी नसल्याने लिफ्टशी संबंध नाही. पोलीस पाटिलकीमुळे आता गावात मान आहे. पूर्वी त्रासात दिवस गेले.

आमचं नाव, पत्ता त्यांनी टिपून घेतला.

आता ग्रामायन आलंय. त्यानी सोसायटी केली. चेअरमनसह सर्व पदाधिकारी गावा-तलेच केलेत. प्रत्येक कागदपत्र सर्वांना सम-जावून सागून काम करीत असतात. गाव-कऱ्याना कामाचा अनुभव येतोय. त्यामुळे ही लिफ्ट आपली आहे ही भावना गावकऱ्यांत निर्माण झाली असून सोसायटीमुळे खते–बियाणं अवजारं घेता येतील. कधी नव्हतं एवढं गाव आता एकत्र आलंय. ग्रामायनमुळे हे सर्व घडतंय. ग्रामायनने इथल्या गारुडी–वडार आणि भिल्ल समाजाकरता काही करावे. गावात आता तेच लोक, विशेषतः भिल्ल समाज उपाशी–दरिद्री असतो. त्यांना सरकारकडून जमिनी मिळवून देण्याचा प्रयत्न ग्रामायनने करावा, अशी अपेक्षा दिसली.

## भूमिहीनांचा प्रश्न

दुपारच्या जेवणानंतर भिल्लवस्तीत गेलो. गावच्या वरच्या बाजूला नदीच्या उंच काठा-वर भिल्लांची घरे आहेत.

पूर्वी झोपड्या होत्या. आता संजय निरा-धार योजनेतली पक्की मातीची घरे होती–

बहुतेक मंडळी घरीच होती. कुणी जाळे विणीत होते. कुणी गप्पा मारीत होते. बायका दारात बसून होत्या. एका घोळक्यासमोर आम्ही उभे राहिलो. कुणी या बसा म्हणेना तशी मग आम्हीच ओळख करून दिली. एकदर सर्वत्र निरुत्साही वातावरण. त्याच्या-तले वृद्ध गृहस्थ श्री. आनंदा गणपत धुळे यांना बोलतं करण्यात यश आलं.

'आम्ही मूळचे इथलेच म्हणायचं. आमचा आजा, पणजा या भागात आला. मासे मारा-यचे. ससे पकडायचे रानातनं. कुठं मिळाली मोलमजुरी तर करायची. असं आमच जीवन. आमच्यात कोण शिकणार? शिकून काय करणार? शिकायला होवं पर अंगावर धडुतं नाय–पोरं शाळेत जाणार कशी? मास्तर घरी पाठवित्यात. लिवायला पाटी पेनसिली आणायला पैसा हाय कुठं? आतापत्तुर घरं नव्हती. इंदिरामायच्या किरपेनं घरं झाली. पूर्वी तसा आमचा दरारा होता. आता कायबी रायल नाय...'

'या गावात लिफ्ट होतेय तुम्हाला काही माहीत आहे का?'

'हां... हा... समदं हाय म्हाईत. पूर्वी मजुरीला जात हुतो आमी. पर मजुरीपरास काय त्याचा आमाला उपेग. हा आता शेता-तनं पाणी जाईल मग आमाला कामं तरी गावतील. पर आता गावात कामबी निगत नाय. पूर्वी लिफ्टवाल्यांनी शाळा सुरू केली. वती. एक बाई यायची शिकवाय पर तिचा पगार परवडना– का काय झाल. पोरं जाई-नात. बद झाली. आमची पोरं आता शिकली तरच काय हुईल. पर हृचे होयचं कसं?'

धुळे हळू आवाजात सांगत होते. त्याच्या बारीक डोळ्यांनी आमच्याकडे पहात ते म्हणाले,

'तुमी काय करणार हायसा... आता...'

'करू, बालवाडी पुनः सुरू होईल इथं...' मी म्हणालो. हरिभाऊ असं म्हणाल्याचे माहीत असल्याने मी बोललो.

'आमची एक संघटना होती पूर्वी, 'क्रांती-कारी मागास युवक संघटना' एक तरुण म्हणाला.

'बरं मग पुढं काय झालं?'

'आम्ही भूमिहिनांना जी जमीन मिळते त्यासाठी प्रयत्न केला. पण काही उपयोग नाही झाला. वाटखर्चीला पैसे नसायचं. आमी समदे चालत जायचो. शहरात दोन दोन दिवस उपाशी रहायचो. ज्यानं आमचं काम करू म्हणून सांगितलं हुतं, त्यानं आमच्या-कडचाच वीस–रुपयाचा खुर्दा नेला पर काम काहीच जाल नाही. समदीकडं हेचं. पयसं द्या–पर आनायच कुठून...?' तो तरुण बोलत होता. असहायपणे त्यांची. संघटना पुढे पैशांअभावी बारगळली.

'आता काय करता तुम्ही?'

'काय कधी मासे पकडायला जातो. ते विकायचे. नाही तर त्येच शिजवून खायचे.'

भिल्लांच्या या वस्तीला गावकऱ्याचा काही त्रास नाही होत. उलट गावकऱ्याचे सहकार्यच होते. कारण मजूर मिळतात. दहा रुपयांपर्यंत मजुरी मिळते. पूर्वी फिरस्ते अस-णारे भिल्ल इथं गावकऱ्यांच्या चांगुलपणानं स्थिरावले. गावकऱ्याना चांगलं म्हणणारे हे दुसरे दलित!

सपूर्ण गावात इंदिरा गांधीचं पोस्टर फक्त या वस्तीत पहायला मिळालं.

कमालीचं दारिद्र्य. स्त्रिया–पुरुष आळसा-वून पडलेले. हा आळस पोट भरल्यानंतरचा नसून सतत उपाशी राहिल्याने आलेल्या भुकेचा आळस! झाडपाला शिजवायचा, पाणी प्यायच. कुठ काही मिळाली मजूरी तर खायची. लहान पोरापासून मोठ्या म्हाताऱ्यां-पर्यंत अंगावर फक्त कमरेलाच काय ते वस्त्र. पोरं तर उघडी नागडीच.

उघड्या माळरानावर हवा खाऊन दिवस काढणाऱ्या त्या भिल्लाचे डोळे निस्तेज दिसत होते. मध्येच कुठं तरी जुनी चमक बोलताना दिसे.

हे उदास वातावरण बदलण्यासाठी तिथे त्यांना रोजगार उपलब्ध होणं आवश्यक आहे. बालवाडी काढल्याने कदाचित मुलं लिहायला

लागतील; पण त्यांच्या पोटातली भूक कशाने भागवणार ?

ग्रामायन पुढे हे एक आव्हानच आहे.

एखाद्या जुनाट रोगावर औषधोपचार करताना इतर अनेक बारीक सारीक रोग, दृष्टोपत्तीस येऊ लागतात. पण त्यांच्यावर जुजबी औषधोपचाराने ते बरे होणारे नसतात. सतत काहीना काही किरकिर त्रास रहातोच. त्या ठिकाणी मुख्य रोगावरच झटून औषधोपचार व्हायला हवेत. मग किरकोळ आजार आपोआपच पळून जातात. तसंच या खेड्यांचं असतं. सांगवीची लिफ्ट चालू झाल्यावर इथल्या बऱ्याचशा कटकटी संपणार आहेत शेतकरीच दरिद्री तर मजुरांना मजुरी कुठली मिळायला ?

निघता निघता धुळे यांनी आणखीन एक व्यथा बोलून दाखवली–

'आमच्या या परिस्थितीमुळं पोरं लग्नाची रायलित आमची. पोरांना देज द्यायला पैसे नाईत.'

भिल्लांच्यात मुलाकडून मुलीला हुंडा द्यावा लागतो !

तो द्यायला नसल्यानं गेल्या दोन वर्षापासून लग्न नाही झालं. दरवर्षी शिमग्याला थेऊरला सर्व गोत्रातली मंडळी एकत्र येतात, तिथंच लग्न लागत्यात. भेटी गाठी होत्यात. पण थोडा तरी पैसा–अगदी पन्नास–शंभर रुपये तरी द्यावे लागतात. आणि तेवढेसुद्धा एकरकमी न मिळाल्याने मुलांची लग्नं नाहीत. त्यातल्या एकाला विचारल्यावर म्हणाला, 'तळेगावात एका ठिकाणी दोन महिन्यासाठी काम मिळणार आहे. त्यानं पैसे साठवून यावरशी लग्न होईल माझं !'

हुंडा प्रथेविरुद्ध शहरातून खूपच चळवळी होतात. परिसंवादातून, महिला मंडळातून, स्त्रीमोर्चा संघटनातून, पथनाट्यातून अलिकडे हा विषय खूपच पोटतिडिकेने मांडला जातोय. पण खेडोपाडी वेगवेगळ्या प्रथा, चालीरीती घेऊन पसरलेला हा समाज यापासून खूप दूर आहे. चळवळी, त्यांचे मार्गदर्शक नेते एका शहरी पांढरपेशा जाणिवात अडकून पडलेयत असं वाटतं.

खेड्यातले बरेचसे सामाजिक प्रश्न हे आर्थिक विषमतेमुळे अद्यापही टिकून आहेत.

□

गावचे माजी सरपंच, विपटचे माजी चेअरमन, श्री मच्छिंद्र रावसाहेब तळेकर, हे एक सुखवस्तू ग्रामस्थ. यांचे गावात किराणा दुकान आहे. गावातले एकमेव दुकान ! शेती आहेच मुलं शिकून धंद्याला लागलेली. एक मुलगा पुण्यात ससूनला भाजी पुरवतो. मोठा कॉन्ट्रॅक्टर आहे. धाकटा मुलगा बारावी पास होऊन दुकान सांभाळतो. घर प्रपंच सांभाळून जेवढी गावाची सेवा करता येईल तेवढी करायची.

गल्ल्यावर बसल्या बसल्या गावातली–वित्तंबातमी लागते. त्यामुळे गावात काय चाललंय याची पूर्ण जाणीव

यांच्याच कारकिर्दीत भिल्लांना संजय निराधार योजनेत घरं मिळाली.

'गावाकडे दुर्लक्ष का? तर पहिला आपला प्रपंच नीट करता आला पाहिजे. प्रपंचाचा ताण नाही सहन होत आणि गावाचा विकास कसा करणार ? आता हे कुणालाच जमलं नाही, जमलं नसतं, खरोखरीच शिवधनुष्य उचलण्याएवढं अवघड काम ग्रामायनने केलंय. लोक फार चांगले आहेत. गावचा विकास होईल; पण जोडधंदा हवा. जर्सी गाई हव्यात. दुधाची जोड मिळाली तर काही तरी प्राप्ती होईल. आम्ही पिकवतो. कष्ट खूप करावे लागतात; पण अखेर आमच्या पदरात काही पडत नाही. दिवसेंदिवस मजुरांचा प्रश्न अवघड होत चाललाय. पूर्वी सूर्य उगवताना येणारा मजूर आता अकरा वाजता कामावर येतो. –संध्याकाळी पाच वाजता काम बंद करतो. कामात हलगर्जीपणा वाढलाय. मजुरांना आता काही बोलता येत नाही. मजुरी रोख देऊनही कामाच्या नावाने पदरात काहीच पडत नाही. आज खेड्यातला सर्वात मोठा आणि निकडीचा प्रश्न मजुरी आणि मजूर झालाय. त्यात इथं उन्हातान्हात राबण्यापेक्षा शहरातली हमाली बरी म्हणून जो तो शहराकडे धावतोय. आमची मुलं शिकतात ती शहराकडे पळतात. मजूर शहराकडे पळतोय. पंचवीस एक वर्षांनी ही शेती म्हणजे एक अवघड बाब होणार आहे.'

तळेकर बोलत होते. त्यांच्या बोलण्यातून गेल्या काही वर्षातील अलिप्तपणातून आलेला अनुभव डोकावत होता.



‘ पूर्वी मणिभाई–अण्णासाहेब मगर यांनी लिफ्ट योजना आणली; पण आमच्या लोकांच्या अज्ञानपणामुळे त्याचा वापर योग्य झाला नाही. कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन नेत्यांकडून झाले नाही. सर्व स्कीम त्यांच्या अधिकारात होती. आवश्यकतेपेक्षा जास्त पैसा काढला गेला. जो हिशोब दिला तो लोकांना पटला नाही. लिफ्टच्या आंदोलनात भाग घेतला; पण या सर्व राजकारणाचा वीट आला अगदी. पिण्यामुळे हे गाव बिघडलं. एक काळ असा होता, पिण्यातच गावकऱ्यांना भूषण वाटत असे. आर्थिक दुर्दशेचं मूळ कारण हे आहे. आज जाणीव निर्माण होऊन सुधारणा होत आहे याचं सर्व श्रेय ग्रामायनला आहे. ग्रामायनचे अनंत पिढ्या न फिटणारे उपकार आहेत या गावावर. अहो नाहीतर कुणाला याचं सोयरसुतक होतं ?’ तळेकर सांगत होते.

## दि. २५ डिसेंबर १९८४

रात्रीचा एक वाजायला आलाय. शिंदे मामांच्या (शिंपी) भजनी मंडळाने आज खास भजनाचा कार्यक्रम आखला होता. बबनराव, हिरामण, शांताराम, जगन्नाथराव आले होते. शिंदेमामांच्या पत्नी आणि नव्याने शाळेत शिक्षिका म्हणून आलेल्या बाई. अशी सर्व मिळून पंधरा–सोळाजण भजनात दंग झाले होते. अभंगाचा एक एक चरण घोळवून घोळवून म्हटला जात होता. वेगवेगळ्या प्रकारचे आवाज एकमेकात मिसळून एक तालबद्ध सूर लागला होता. त्या तालात सांगवीची नव्या दिशेने वाटचाल सुरू झाली होती. भजनी मंडळात आठवी नववीतली मुलंपण होती. सांगवीला आता स्वतःचा सूर सापडलाय. बारा वर्षांच्या वनवासातून बाहेर पडायला जरी वेळ लागला तरी हळूहळू गाव माणसात येऊ लागलंय.

आज गावकऱ्यांची बैठक उत्साहात झाली. मागे रहाणारेही आज हजर होते. नामदेव माळी, माजी सरपंच शांताराम पाबळे, आजी सरपंच शितोळे, चेअरमन रामचंद्र लोले प्रकृती ठीक नसताना आले होते. पिंगळे काकाही उपस्थित होते.

सर्वांच्या चेहऱ्यावरून आनंद ओसंडून वहात होता. हरिभाऊंचा चेहरा कृतकृत्य झाल्यासारखा दिसत होता. इतक्या दिवसांच्या श्रमाने त्यांच्या अंगात ताप होता. तरीही हरिभाऊ आज उपस्थित राहून गावकऱ्यांच्या आनंदात सहभागी झाले होते.

बैठक रंगू लागली होती. हळूहळू बारा वर्षाचा वनवास विसरून गावकरी पाणी वाटप–पाणीपट्टी इ. मुद्द्यांवर चर्चा करू लागले. वादविवाद रंगू लागले. लोकांच्या मनातील इतके दिवस लपलेला–विझलेला स्वार्थ हळूहळू जागा होऊ लागला. आबा माझ्या शेजारीच बसला होता. माझ्या कानात तो पुटपुटला– ‘बघा, कालपर्यंत तुम्हाला देवासारखे दिसणारे हे लोक स्वार्थ जागा झाल्यावर कसे हमरीतुमरीवर येताहेत.’

मी हसलो. हा स्वार्थच जागा करणे महत्त्वाचे काम होते. सांगवीतल्या लोकांना स्वार्थच समजला नव्हता. आता त्यांना स्वतःच्या हक्काची जाणीव झालीय. मागच्या अनुभवावरून ते शहाणे झालेत. ही लिफ्ट ज्या कारणांनी बंद पडली ती कारणे आता पुनः उद्भवू देणार नाही, असे जो तो सांगतोय. कर्ज फेडून गावाला पुढे आणण्याची भाषा करतोय. पाण्याच्या थेंबाथेंबाचा उपयोग विकासाकरता करण्याचे ठरवतोय. गरीब–दलित बांधवांना बरोबर घेऊन एकात्म विकास साधण्याची भावना बोलून दाखवतोय. ते त्याच्या मनातील विकासाचा स्वार्थ जागविल्यामुळेच. ग्रामायनच्या कार्याचे मोठे यश यातच आहे. इथला अडाणी शेतकरी जागा झालाय. आपल्या हक्कांच्या जाणीवांनी.

ग्रामायनच्या असंख्य कार्यकर्त्यांच्या श्रमांचे चीज झाले. आज भजनात कधी नव्हे तो रंग चढला होता. टाळ–मृदुंगाच्या आवाजाने भग्न विष्णु मंदिरातील चिरे थरारले असतील. विष्णूच्या अंगावर रोमांच उभे राहिले असतील. विष्णू डोहातील पाण्याच्या लाटा भजनाच्याच तालात आपला सूर मिसळून सांगवीच्या विकासाचे गीत गाऊ लागल्या असतील.

□


आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विचारवंत
नानी पालखीवाला
यांचा
गेल्या तीस वर्षातील भारतीय राजकारणाचे परखड विवेचन करणारा,
प्रत्येकाच्या संग्रही अवश्य हवाच असा महत्त्वपूर्ण ग्रंथ

महाराष्ट्रातील
सर्व प्रमुख पुस्तक विक्रेत्यांकडे
नोंदणी चालू आहे

वुइ, दि पीपल
अनुवाद :
वि. स. वाळिंबे

मूल्य १०० रुपये।
प्रकाशनपूर्व सवलत ६० रु.
नोंदणीची
शेवटची तारीख :
१५ एप्रिल ८५

मेहता पब्लिशिंग हाऊस
भावेस्कूल जवळ, पुणे-३०
अजब पुस्तकालय,
कोल्हापूर

Ravimukul

# यांचे सहकार्य मिळाले नसते तर दिरंगाई, सरकारी लालफित आणखी कितीतरी वाढली असती....

सागवी-सांडस येथील बंद योजनेच्या पुनरुज्जीवनाचे काम वेगवेगळया अवस्थांमध्ये एकूण सतत दोन वर्षे चालू होते. या काळात अनेक सरकारी खाती, बँका व अन्य संस्थांमधील अधिकारीवर्गाला ग्रामायनच्या कार्यकर्त्यांनी व योजनेच्या सभासद मंडळीनी वारंवार भेटून तसदी दिली आहे.

योजनेच्या पुनरुज्जीवनासाठी प्रथम योजनेची संपूर्ण तांत्रिक पहाणी करून त्या आधारे बँकेसाठी तांत्रिक अहवाल तयार करून देण्याचे काम लोहगावच्या संत तुकाराम कृषी सेवा सहकारी संस्थेकडून करून घेण्यात आले. श्री. गिरीश सोहोनी, श्री. एस्. के. पाटील व श्री. मेहेंदळे या तंत्रज्ञानी हे काम पार पाडले.

ही योजना प्रथम हवेली तालुका लिफ्ट इरिगेशन फेडरेशनच्या व्यवस्थापनाखाली होती. फेडरेशनचे कार्यकारी सचिव श्री. मराठेसाहेब व व्यवस्थापक श्री. पवार यानी पाणी परवानगी, वीज पुरवठा, बँक कर्ज या सर्वासाठी फेडरेशनच्या वतीने ना हरकत प्रमाणपत्रे उपलब्ध करून दिली. योजनेला कोल्हापूर बंधाऱ्यावरील पाणी परवानगी शासनाच्या लघु-पाटबंधारे विभागाकडून मिळाली.

योजनेच्या दुरुस्तीसाठी बँक ऑफ महाराष्ट्राचे कर्ज घेण्यात आले आहे. त्यासाठी बँकेचे अध्यक्ष श्री. पी. एस्. देशपांडे, उपसरव्यवस्थापक श्री. एम्. व्ही. सोमण व त्याचे सहाय्यक अधिकारी श्री. एल्. के. देशपांडे व श्री. गणपुले, बँकेच्या मध्य प्रभागातील विभागीय व्यवस्थापक श्री. भागवत, पुणे ग्रामीण विभागाचे श्री. कर्णिक व त्याचे कृषी अधिकारी श्री. एम्. जी. गुरव, श्री. अब्दुल रहिम व श्री. कुमार आणि ज्या शाखेतून कर्ज वितरण करण्यात आले त्या तळेगाव ढमढेरे शाखेचे व्यवस्थापक श्री. व. ल. शिंदे या सर्वांचे सहकार्य मिळाले.

योजनेवर शासनाचे जुने कर्ज असल्याने दुरुस्तीसाठी कर्ज देताना बँकेने योजनेच्या पुनरुज्जीवनासाठी शासनाची परवानगी आणण्यास सांगितले होते. त्यासाठी शासनाचे महसूल खात्यातील अंडरसेक्रेटरी श्री. वऱ्हाडकर, पुण्याचे जिल्हाधिकारी श्री. आनंद भडकमकर, रजाराखीव जिल्हाधिकारी श्री. का. नि. पुरंदरे, हवेलीचे मामलेदार श्री. देशपांडे, टेनन्सी ब्रँचमधील अधिकारी श्री. जेस्ते व श्री. कुदळ यांचे सहकार्य मिळाले. तसेच या कामी ग्रामायनचे एक हितचिंतक व शासनाच्या ग्रामीण विकास खात्याचे उपसचिव कॅप्टन जठार यांचेही सहकार्य मिळाले.

योजनेचा वीजपुरवठा दहा वर्षापूर्वी कायमस्वरूपी तोडण्यात आला होता. त्यामुळे योजनेला नव्याने वीजपुरवठा मिळविणे आवश्यक होते. त्यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या पुणे विभागाचे अधिक्षक अभियंता श्री. काबळेसाहेब, कार्यकारी अभियंता श्री. शुक्लासाहेब, विभागीय अभियंता श्री. रानडेसाहेब, हडपसर उपविभागाचे सहाय्यक अभियंता श्री. चव्हाण व कनिष्ठ अभियंता श्री. बुर्ली यांचे सहाय्य झाले. तसेच पुणे ग्रामीण मंडळातील सहाय्यक अभियंता सौ. जोशी, चीफ अकौंटंट श्री. जोशीसाहेब, तसेच त्याचे सहाय्यक अधिकारी श्री. पाटील व श्री जगदाळे यांचेही या कामी खूपच सहकार्य मिळाले.


योजनेस वीजपुरवठा मिळण्यापूर्वी योजना पाणीपुरवठा सहकारी संस्था म्हणून रीतसर नोंदली जाणे आवश्यक होते. त्यासाठी सहकार खात्यातील पुणे जिल्हा उपनिबंधक श्री. सुग्रीव ठाकरे, हवेली तालुका सहाय्यक निबंधक श्री. घोख व त्याचे सहाय्यक अधिकारी श्री. जाधव यांचे विशेष सहकार्य मिळाले. त्यानी अल्पावधीत संस्थेच्या नोंदणीचे काम पूर्ण करून दिले.

कर्ज घेणाऱ्या सभासदांची नजरगहाणखते हवेली तालुक्याचे जॉईंट सबरजिस्ट्रार श्री. पवार यांच्या कार्यालयात नोंदविण्यात आली.

याशिवाय योजनेचा ट्रान्सफॉर्मर दुरुस्त करण्याच्या कामी पुण्यातील महती इलेक्ट्रिकल्स या कंपनीच्या शहा बंधुंची अतिशय मोलाची मदत झाली.

**–सचिव, ग्रामायन**

# ग्रामायनचे कार्यकर्ते आणि गावकरी




□

उभे राहिलेले डावीकडून पहिले आहेत ग्रामायनचे पूर्णवेळ कार्यकर्ते नामदेव माळी. त्यांच्या खांद्यावर असलेले पल्लवी हे त्यांचे पहिलेच अपत्य असले तरी सांगवी सांडसची लिफ्ट हे त्यांनी पुनर्जन्म दिलेले तिसरे अपत्य. ( आणि पुढे तरी त्यांना कोण अडवणार? ) त्यांच्या शेजारी आहेत जयश्री माळी. नामदेवची पत्नी. त्यांच्या शेजारी आहेत ग्रामायनचे हरिभाऊ टेमगिरे. दोन वर्षे सांगवीत मुक्काम ठोकून पुनर्जन्माच्या सर्व कळा त्यांनी गावकऱ्यांच्या बरोबरीने सोसल्या आहेत. सध्या लिफटच्या संगोपनाचाही भार मुख्यत: त्यांच्यावरच आहे. त्यांच्या शेजारी आहे त्यांची पत्नी आणि पुढे मुलगा–संदीप. उभे, उजवीकडून तिसरे आहेत सांगवीतील एक तरुण कार्यकर्ते दत्ता तळेकर, दुसरे शिंदे टेलर आणि पहिले लिफटचे एक सभासद बाबुराव कांबळे.

खाली बसलेल्यांत डावीकडून पहिले आहेत बबनराव लोले, दुसरे हिरामण लोले आणि तिसरे शांताराम लोले. ही तीनही माणसे हरिभाऊंच्या पाठिशी नेटाने उभी राहिली. चौथे आहेत मिरजेच्या ' एकात्म समाज केन्द्रा 'चे कार्यकर्ते दादा धनवडे. सध्या वर्षभर ते ग्रामायनच्या निमगाव – म्हाळुंगी प्रकल्पाच्या ठिकाणी काम करीत आहेत. म्हैसाळच्या विठ्ठल सोसायटीत त्यांनी काही काळ काम केले आहे. पाचवे अशोक सातकर ग्रामायनचे पूर्णवेळ कार्यकर्ते. देवकरवाडी, दहिटण्याच्या कामात ते नामदेव माळींचे सहाय्यक आहेत.

□

## ग्रामायनचे कार्यकर्ते आणि गावकरी



उभे डावीकडून पहिले आहेत ग्रामायनचे सुरेश पवार. ग्रामायनच्या वतीने सांगवीला पहिली भेट यांनी दिली. कोरेगाव–भीवर योजनेच्या पुनरुज्जीवनासाठी त्यांनी चार वर्षांपूर्वी कोरेगावमध्ये मुक्काम टाकला. दीड वर्षात लिफ्ट चालू झाली. सध्या ते त्या योजनेच्या व्यवस्थापनाचा भार संभाळीत आहेत. पवारांच्या शेजारी सांगवीतील तरुण कार्यकर्ते श्री. लोले आणि लोल्यांजवळ उभे आहेत– (टोपी घातलेले) दत्तू सोनबा तळेकर व नवजीवन सोसायटीचे व्हाइस चेअरमन; त्यांच्या डाव्या हातास आहेत सांगवीचे नवे सरपंच रामभाऊ शितोळे ( टोपी नसलेले ) आणि त्यांच्या डाव्या हाताशी आहेत सांगवीतील तरुण कार्यकर्ते माजी सरपंच शांताराम पावळे. त्यांच्यापुढे आहेत योजनेचे एक सभासद किसन जयवंत लोले, लोल्यांच्या डाव्या हातास नवजीवन सोसायटीचे चेअरमन किसन विठ्ठल लोले. लोल्यांच्या मागे आहेत ग्रामायनचे सचिव अनिल काळे–सर्व योजनांच्या पुनर्जन्मासाठी पुण्या–मुंबईतील सर्व इष्ट देवदेवतांचे –सरकार आणि बँकांचे अधिकारी–अनेकोत्तम आशीर्वाद गोळा करीत यांना फिरावे लागते, म्हणून यांच्या खांद्याला झोळी आहे. लोल्यांच्या डाव्या हातास आहेत ग्रामायनचे नवे पूर्णवेळ कार्यकर्ते रविकांत आदरकर, त्यांच्या मागे सांगवीच्या योजनेच्या दुरुस्तीचे काम वेळ आणि पैसा या दोन्ही दृष्टया थोडक्यात करणारे इलेक्ट्रिशियन किसन म्हस्के. उभे, उजवीकडून दुसरे, ग्रामायनचे पूर्णवेळ कार्यकर्ते नारायण फडतरे–निमगाव म्हाळुंगीच्या 'नवचैतन्य संयुक्त सहकारी शेती' प्रकल्पाची जबाबदारी यांच्यावर आहे. त्यांच्या पत्नी विमल फडतरे–यांनी मात्र सूज्ञपणे या फोटोत अधिक गर्दी करण्याचे टाळलेले दिसते. उजवीकडून पहिले आहेत सांगवीत ऐन पुनर्जन्माच्या घटकेला साक्षी राहण्यासाठी सांगवीत जाऊन पंधरा दिवस मुक्काम टाकणारे 'माणूस' प्रतिनिधी गिरीश प्रभुणे; 'गोष्ट सांगवी सांडसची 'चे लेखक. खाली बसलेल्यांत उजवीकडून दुसरे आहेत ग्रामायनचे कार्यकर्ते राजन केसरकर आणि अन्य लहान थोर मंडळी आहेत–या पुनरुज्जीवनाच्या कामात जिद्दीने सहभागी झालेले योजनेचे काही सभासद.

# शीवतक्रार–म्हाळुंगी ते सांगवी – सांडस....'ग्रामायन'....थोडक्यात

'माणूस'च्या वाचकांना 'ग्रामायन' अपरिचित नाही. गेली अकरा वर्षे ग्रामायनचे काम सातत्याने चालू आहे. सुरुवातीला कार्यकर्त्यांचे मेळावे, युवकांची शिबिरे, पुस्तिका प्रकाशन असे उपक्रम चालू होते. ग्रामीणविकास कार्याला पूरक असे हे सर्व उपक्रम होते हे खरे; पण विकास कार्यातील अडचणींची खरी कल्पना यायची तर असे काठावरून चालून भागणार नव्हते. प्रत्यक्ष विकासकार्य हाती घेण्याची निकड जाणवत होती. १९७६ मध्ये सुपे (बारामती) येथे वर्षभर काही काम करण्यात आले; पण या कामाची खरी घडी जमली ती १९७८ पासून.

तिथपासून गेल्या सात वर्षांत शिरूर, दौंड, हवेली या पुणे जिल्ह्याच्या दुष्काळी भागात ग्रामायनचे आठ विकास प्रकल्प उभे राहिले आहेत. यात मुख्यत: बंद पडलेल्या सामुदायिक उपसा सिंचन योजनांचे पुनरुज्जीवन करण्याच्या पाच प्रकल्पांचा समावेश आहे. यातील सांगवी सांडससह तीन पूर्ण झाले आहेत तर देवकरवाडी आणि दहिटणे या गावातील दोन योजनांच्या पुनरुज्जीवनाचे काम सुरू करण्यात आले आहे.

या उपसासिंचन योजनांच्या पुनरुज्जीवन कामाला सुरुवात झाली शीवतक्रार येथील कामापासून. शीवतक्रार–म्हाळुंगी हे सांगवीसारखेच एक गाव.शिरूर तालुक्यातील, तळेगाव ढमढेरे जवळचे. भूविकास बँकेचे एक संचालक श्री. विनायकराव पाटील यांच्या सूचनेचा विचार करून जून १९७८ मध्ये येथे ग्रामायनने प्रथम कामास सुरुवात केली. पस्तीस कुटुंबाचे हे लहानसे गाव, लिफ्टमुळे कर्जाच्या खाईत पूर्ण बुडालेले होते. जमिनी लिलावात निघाल्या होत्या. वसुलीसाठी घरातील वस्तूही जप्त होण्याची पाळी आली होती. विनायकराव भूविकास बँकेच्या संचालक मंडळावर त्यावेळी असल्याने त्यांनी बँकेला जप्तीची कारवाई थांबविण्यास सांगितले. तसेच दुरुस्तीसाठी वाढीव कर्जही मंजूर केले. स्वयंसेवी संस्थेने येथे लोकांचा विश्वास प्राप्त करून घेऊन थोडी मध्यस्थाची, थोडी लोकशिक्षणाची जबाबदारी पत्करली तर विकासाचे हे घसरलेले, चिखलात रुतलेले गाडे पुन्हा वर येऊ शकते, स्वयंसेवी संस्थांना अशी कार्यक्षेत्रे हे एक मोठे आव्हान ठरू शकते असे विनायकरावांना वाटले. म्हणून ग्रामायनने पुढाकार घ्यायचे ठरवले.

नामदेव माळी या ग्रामायनच्या पूर्णवेळ कार्यकर्त्याने म्हाळुंगीत मुक्काम टाकला आणि सहा महिन्यांच्या अवधीत लिफ्ट पुन्हा चालू झाली.

आता गेली सहा वर्षे येथील लिफ्ट सुरळीत चालू आहे. अडचणी येतात; पण सभासद एकत्र बसून त्यातून मार्गही काढतात. लहानात लहान शेतकऱ्यालाही नियमानुसार पाणी मिळते. स्थानिक तरुणानीच आता लिफ्टचा कारभार बव्हंशी सभाळला आहे. पाच वर्षांत बँकेचे तीन लाखांचे कर्जही फिटले आहे.

हा प्रयोग यशस्वी होतो आहे हे दिसल्यावर आसपासच्या गावातील लोकही ग्रामायनकडे येऊ लागले. दौंड तालुक्यातील कोरेगाव भीवरची दहा वर्षे बंद असलेली लिफ्टही ग्रामायनच्या मदतीने १९८२ च्या ऑक्टोबरमध्ये पुन्हा चालू करण्यात आली. आज ही लिफ्टही व्यवस्थित चालू आहे.

या बंद पडलेल्या योजनाकडे ग्रामायन शेतकऱ्याचे संघटन आणि प्रबोधन करण्याचे एक साधन म्हणून पाहते. आर्थिक] उपक्रमाभोवतीच हे कार्य अधिक परिणामकारकरीत्या होऊ शकते असे

## 'ग्रामायन'चा वार्षिक अंक मे ८५

ग्रामायनने सुरुवातीच्या काळात दरवर्षी एक 'ग्रामायन'चा अंक प्रसिद्ध केला होता; परंतु अलिकडे त्यात खंड पडला होता. यावर्षी 'ग्रामायन'चा असा वार्षिक अंक मे ८५ मध्ये प्रसिद्ध होत आहे. 'सामाजिक परिवर्तनामध्ये स्वयसेवी कार्याचे स्थान' हा या अंकाचा मुख्य विषय आहे. या महत्त्वाच्या विषयावर चर्चा घडवावी तसेच ग्रामायनच्या आर्थिक स्वयपूर्णतेसाठी जाहिरातरूपाने काही निधी गोळा करावा अशा दोन्ही हेतूनी या अंकाचे आयोजन केले आहे. तरी वरील विषयावर कार्यकर्त्यांनी व विचारवतानी आपले विचार थोडक्यात लिहून पाठवावेत. निवडक लेखांना या अंकात प्रसिद्धी दिली जाईल.

तसेच ग्रामायनच्या हितचिंतकांनी या अकासाठी जाहिराती पाठवाव्यात व मिळवून देण्यातही साहाय्य करावे ही विनंती. दरपत्रकासाठी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

—सचिव, ग्रामायन, ७२०।१८ नवी पेठ, लालबहादूर शास्त्री मार्ग, पुणे ४११०३० । कार्यालयाची वेळ : दु. २ ते साय. ८

ग्रामायनच्या कार्यकर्त्यांना वाटते. केवळ व्याख्यानातून, शिबिरातून प्रबोधनाचे धडे देऊन भागत नाही. त्याचबरोबर केवळ आर्थिक उन्नतीकडे लक्ष देऊनही कार्य पुरे होत नाही. त्याच्या जोडीला सामाजिक, सांस्कृतिक स्वरुपाचेही काम आवश्यक असते. स्थानिक गरज, लोकांची तयारी आणि संस्थेची कुवत या गोष्टी लक्षात घेऊन या क्षेत्रातील उपक्रम पार पाडले जात आहेत. सर्व क्षेत्रात सारखेच यशच आहे असे मात्र नाही.

लिफ्ट सुरू झाली तरी ती चालू ठेवण्यासाठी व्यवस्थापनाचे धडे द्यावे लागतात, पाणी वाटपाची व्यवस्था घालून द्यावी लागते. रोजच्या व्यवहारातील प्रश्न, भांडण–तंटे सोडविण्यासाठी यंत्रणा उभी करावी लागते. पाण्याचा वेळेवर आणि योग्य वापर इत्यादी अनेक गोष्टीही आल्याच. काम चालू असतानाच डोळसपणे आकडेवारी, माहितीही घेतली जात आहे. या सगळ्या धडपडीला काही अर्थ आहे का ? या मार्गाने प्रश्न सुटणार आहे का ? या कामाचा व्यापक चळवळींशी कसा संबंध येतो ? सरकारच्या धोरणात कोणता बदल हवा ? त्यासाठी काय काय करावयास हवे–?

लिफ्ट चालू झाल्याने उत्पादनाचे प्रश्न सुटतात. पण तेवढ्याने भागत नाही. कांदा, भुईमुगाचे उत्पादन घेणे एकवेळ सोपे; पण त्याची विक्री करणे अधिक कष्टाचे आणि बऱ्याच वेळा मानहानीचे. शिवतक्रार म्हाळुंगीचा गबाजी म्हणाला, 'तीन दिवस रातनदीस कांद्याच्या ढिगावर बसून काढले, नाफेडच्या अधिकाऱ्याच्या मेहरबानीची वाट पहात. या तीन दिवसात पिण्याचे पाणीदेखील विकत घ्यावे लागले. बायको रोज आठ मैलांवरून भाकरी आणायची.' म्हणून लिफ्ट चालू झाली की, त्याचा संबंध विक्री व्यवस्था, वाहतूक साधने, साठवण आणि किंमती अशा गोष्टींशी येतो. त्याशिवाय जमीन समतल करणे, पाणी जास्तीत जास्त जमिनीवर पोहोचण्याची व्यवस्था करणे, पाण्याचा अपव्यय टाळणे इत्यादी अनेक बाबतीतही काही ना काही करावे लागते.

व्होल्टेज कमी जास्त झाले की मोटार जळते. मग ऐन महत्त्वाच्या वेळी पाणी मिळू शकत नाही, पिकं जळू लागतात. वीज वारंवार बंद होणे नित्याचेच. याही बाबतीत हालचाल आवश्यक ठरते. वरील ठिकाणी शासनाच्या या ना त्या खात्याचा आणि धोरणाचा संबंध येतो. गावपातळीवरच्या अशा कामातील असंख्य अडचणी दूर होऊन विकासाला अनुकूल वातावरण तयार होण्यासाठी सरकारी धोरणाची चौकट बदलणे आवश्यक आहे. एका बाजूला लोकांचे संघटन, प्रबोधन, सहकार, दुसऱ्या बाजूला, योग्य धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यास शासनाला भाग पाडणारी कृती, या दोनही गोष्टी सारख्याच महत्त्वाच्या आहेत. येत्या चार–पाच वर्षात शक्य झाले तर या परिसरातील आणखी आठ ते दहा योजनांना पुन्हा गती देण्याचा ग्रामायनचा प्रयत्न आहे.

महाराष्ट्राच्या संदर्भात तरी हा बंद सामुदायिक उपसा सिंचन योजनांचा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. आज महाराष्ट्रात अशा कमीत कमी एक हजार योजना बंद असाव्यात असा अंदाज आहे. त्यात १९६५ ते १९७० च्या दरम्यान काही जिल्ह्यात ' धडक योजनेत ' झालेल्या लिफ्टस्, तसेच पूर्वी शासनाने पाटबंधारे खात्याच्या अखत्यारित बांधलेल्या लिफ्टस् यांचा समावेश आहे. यामध्ये काही कोटींचे भांडवल तर गुंतले आहेच पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे, हजारो शेतकऱ्यांची विकासाची बस चुकली/संधी हुकली. दहा पंधरा वर्षांनंतर यातील काहींची कर्जे माफ झाली असली तरी मध्यंतरीच्या काळात हे शेतकरी विकासाच्या वाटेवर जाण्याऐवजी, थकबाकीदार होऊन कर्जबाजारीपणाच्या गर्तेत लोटले गेले. त्यांचे अपरिमित नुकसान झाले. केवळ कर्जे माफ झाल्याने ते भरून येणार नाही. जरूर तिथे कर्जे माफ व्हायला हवीतच, पण योजना पुन्हा चालू होणे आणि त्या पुढे चालू रहाणे अधिक महत्त्वाचे. हा सर्व विषय एकूणच खूप गुंतागुंतीचा असला तरी तो टाळून चालणार नाही.

या सर्व कार्यविस्तारासाठी ऑक्सफॅम, उंडार्प या संस्थांकडून अनुदानरूपाने तर बँक ऑफ महाराष्ट्रकडून कर्जरूपाने अर्थसहाय्य मिळाले आहे. अलिकडेच ' इंडस्ट्रियल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया ' या निमशासकीय संस्थेकडूनही कर्ज व अनुदाररूपाने काही अर्थसहाय्य मिळाले आहे. या कामाचे महत्त्व अनेकांना जाणवत आहे ही समाधानाची बाब आहे.

मुंबई विद्यापिठाच्या एका विभागाने तसेच नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ बँक मॅनेजमेंटच्या एका अभ्यासकाने या कामाच्या अर्थशास्त्रीय, व्यवस्थापकीय बाजूंचे मूल्यमापन करण्याचे कामही नुकतेच हाती घेतले आहे.

सामुदायिक उपसा सिंचनाप्रमाणेच




सामुदायिक शेतीचेही दोन उपक्रम—दोन वर्षांपासून ग्रामायनने याच कार्यक्षेत्रात हाती घेतले आहेत. हे दोन्ही प्रकल्प निमगाव—म्हाळुंगी येथे आहेत. गावात महार समाजाच्या सत्तावीस कुटुंबांच्या मालकीची सव्वाशे एकर जमीन आहे. पण ही सर्व कुटुंबे पोटापाण्यासाठी मुंबईत, अर्थातच मुंबईच्या झोपडपट्टीत गेली होती. आता त्यातील आठ कुटुंबे गावी परतली असून सामुदायिक पद्धतीने शेती कसत आहेत. वर्ष दोन वर्षांत आणखीही कुटुंबे परत येतील. सर्वांनी मिळून 'नवचैतन्य संयुक्त सहकारी शेती संस्था' स्थापन केली आहे. तिची रीतसर नोंदणी झाल्यावर या कामास अधिक गती येईल. म्हैसाळ प्रकल्पाच्या श्री. मधुकरराव देवलांचे मार्गदर्शन या कामात मिळते आहे हे नमूद करायला हवे.

सामुदायिक शेतीचा दुसरा प्रकल्प आहे फासेपारधी समाजाच्या पाच कुटुंबांचा. गेली कित्येक वर्षे हातभट्टी, भुरट्या चोऱ्या यावर ही कुटुंबे उपजीविका करीत होती. आता त्यांनी पूर्वी शासनाकडून मिळविलेली जमीन सामुदायिकरीत्या कसण्यास सुरुवात केली आहे. दिल्लीच्या योजनाकारांचेही या प्रकल्पाकडे लक्ष वेधले आहे व ग्रामायनचे कार्यकर्ते नुकतेच या प्रकल्पाची माहिती घेऊन दिल्लीला जाऊन आले आहेत.

संयुक्त शेतीच्या या दोन्ही उपक्रमातून दारिद्र्यरेषेखाली असलेल्या काही मागासवर्गीय कुटुंबांची आर्थिक स्थिती निश्चितच बदलणार आहे. पण त्यातून संयुक्त शेतीचा एक नमुना विकसित होईल का ? सामाजिक परिवर्तन किती साध्य होईल ? 'रिव्हर्स मायग्रेशन'ची एक नवी शक्यता निर्माण होईल का ? सवर्ण समाजातील अल्पभूधारकांनाही सामुदायिक शेतीचा अवलंब करावासा वाटेल का ? हे सर्व अनुभवांती ठरायचे आहे.
निमगावमध्येच मातंग, वडार व मराठा सभासद असलेली साठ एकरांची सामुदायिक उपसा सिंचन योजना दोन वर्षांपूर्वी ग्रामायनच्या प्रयत्नातून उभी राहिली आहे. तिचाही अनुभव या संयुक्त शेती प्रकल्पांच्या संदर्भात अभ्यासता येईल.

सांगवी—सांडस योजनेच्या निमित्ताने गेल्या सात—आठ वर्षांतील 'ग्रामायन'च्या प्रत्यक्ष विकासकार्याचा हा थोडक्यात घेतलेला आढावा आहे. जाणत्यांनी त्याचे मूल्यमापन करावे आणि ते करतीलही. पण जाणिवेच्या लोकांनी हे वाचून या कामात प्रत्यक्ष सहभागी व्हावी हीच आमची अपेक्षा आहे.

व. द. देशपांडे, अध्यक्ष
अनिल काळे, सचिव
ग्रामायन, पुणे


३१ ऑक्टोबर – इंदिराजींची हत्या
१ नोव्हेंबर – दिल्लीत हिंसाचाराचे थैमान
३१ डिसेंबर – राजीव गांधींचा प्रचंड विजय
१९८४ मधील या ऐतिहासिक घटनांचा मूलगामी वेध घेणारे, भारतातील चार नामवंत पत्रकारांनी लिहिलेले पुस्तक

इंदिराजींची हत्या आणि नंतर

इंदिराजींची हत्या आणि नंतर

अरुण शौरी । प्रणय रॉय । शेखर गुप्ता । राहुल बेदी
अनुवाद । शरद महाबळ
मूळ किंमत ३० रुपये । प्रकाशनपूर्व सवलत २० रु.
लवकरच प्रकाशित होत आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊस
पेरुगेट, भावेस्कूलजवळ, पुणे ३०

अजब पुस्तकालय
कोल्हापूर २



प्रसिद्ध स्त्री-रोग तज्ज्ञ डॉ. बी. एन्. पुरंदरे यांची आत्मकथा

**शल्य-कौशल्य**
मूळ किंमत रु. ६०/–
सवलतीत रु. ४५/–

सुधारित २ री आवृत्ती

श्री. नानासाहेब यांचे रुद्राक्षावरील संशोधन, गर्भवती स्त्रियांना मुलगा होणार की मुलगी याची रुद्राक्षावरून ते करत असलेली परीक्षा व मेडिकल कॉलेजच्या प्रवेशासंबंधीची त्यांची परखड मते असे मिळून सुधारित आवृत्तीत वाढवलेले प्रकरण ११ वे अत्यंत वाचनीय.

तसेच प्रसिद्ध लेखक श्री. रा. भि. जोशी यांची दोन संग्राह्य पुस्तके

१. सोन्याचा उंबरठा रु. ४०/–
२. घाट शिळेवरि उभी रु. ५०/–

एकूण ९०/– रु. किंमतीची पुस्तके ६५/– रुपयांत.

संपर्क साधा : **अश्वमेध प्रकाशन**
द्वारा : ज्ञानदा ग्रंथ वितरण, कृष्ण निवास, मानपाडा रोड, डोंबिवली पूर्व ४२१२०१.

भविष्यकाळाप्रमाणे तुम्ही पुढे जायला हवे. पण मागे झाले ते समजून घेऊन....

# पूर्णत्वाचे प्रवासी

लेखक : प्रा. शरद कुलकर्णी

प्रिय श्री. शरद कुलकर्णी,

तुमचे पत्र आणि 'राम', 'श्रीकृष्ण' यांवरील लेखन मिळाले. आनद वाटला. धन्यवाद. त्यानतर लवकरच वाचून संपवलं. तुमची कल्पना उत्तम आहे या महापुरुषांच्या चरित्राचे तुम्ही पाडलेले विभाग व त्यानुसार केलेले विवेचन अभ्यासपूर्ण, खेळकर व घरगुती स्वरूपाचं आहे. भावी पिढ्यापर्यंत 'हे जुने ठेवणं' पोचवणं हे 'आजोबा'चे कर्तव्यच आहे आणि ते तुम्ही आत्मीयतेनं, तळमळीनं, आपल्या व्यासगाचा, अनुभवाचा, प्रज्ञेचा, चिंतनाचा उपयोग करून केलं आहे, अस आढळून आलं. 'मुलांचे चालीने चालावे' या भूमिकेतून तुम्ही खाली उतरून चालता आहा, असं दिसत या उपक्रमाबद्दल मी तुमचं प्रथमतः मनःपूर्वक अभिनंदन करतो. ...तुमच्या माडणीतल नाविन्य जाणवल व आवडलं. उदा. 'सयम' याच स्पष्टीकरण मार्मिक आहे शंकराचार्यांच्या 'मायावादा'वरलं विवेचन तुमच्या अधिक परिणत दृष्टीचं द्योतक आहे. तुम्ही अवश्य ही पत्रं ग्रंथरूपान प्रसिद्ध करावीत.'तरुणांना व आम्हा सर्वांनाच ती प्रेरक, बोधक होतील. शुभेच्छा.

## —गं. वि. कुलकर्णी

मराठीचे व सस्कृतचे प्राध्यापक लेखक व कवी, कोल्हापूर

तुमच्या लिखाणाचा सर्वात महत्वाचा गुण म्हणजे त्यांची वाचनीयता. ही पत्रे वाचताना कोठेही कटाळा येत नाही. दुसरे असे की ती अकृत्रिम आहेत. आपल्या नातवडाना पत्र लिहिण्याच्या मिषाने तुम्ही निबध लिहिले नाहीत तर तुम्ही खरोखरच आपल्या नातवडाना पत्रे लिहित आहात असे वाटते. आज ती नातवडे वयाने फारच लहान आहेत आणि आज तरी ही पत्रे वाचणार नाहीत हे खरे; पण हा भाग फारसा लक्षात राहत नाही आणि आज नाही तर उद्या तरी ती पत्रे वाचतील असे वाटते. पत्रामध्ये तुमच्या पूर्वीच्या आयुष्यातले जे अनेकविध संदर्भ आले आहेत त्यामुळे त्याना जिवतपणा आला आहे.

## —प्राचार्य निळकंठ डोंगरे

सिडनेहॅम कॉलेज ऑफ कॉमर्स ॲन्ड एकॉनॉमिक्स, मुवई.

आजोबांनी आपल्या लहानग्या दोन महिन्याच्या नातवांना लिहिलेली ही पत्रे त्याची पुन्हा पुन्हा पारायणे करावीशी वाटतात. वाचता वाचता आजोबाच्याऐवजी जिजामाता दिसू लागतात. ज्या तऱ्हेचा 'शिवाजी राजा' घडायला हवा होता त्या तऱ्हेचे आदर्श बालशिवाजीच्या समोर गोष्टीरुपाने जिजाईने ठेवले. रामासारखा

## सौ. वासुदेव

सुपरिन्टेंडेट, शिक्षणविभाग, मुंबई महानगरपालिका, मुबई

आदर्श राजा, अर्जुनासारखा योद्धा या आदर्शांनीच घडविला. या आजोबानीही आपल्या आयुष्यातल्या काही प्रसगातून, काही अनुभवातून आपल्या नातवाना या आत्मगुजनातून बरेच काही सांगितले आहे पहिल्याच पत्रात त्यांनी लिहिले आहे, 'तुम्ही माझे नातू म्हणून आम्ही खेळलेले खेळच तुम्ही खेळले पाहिजेत हा आग्रह नाही. भविष्यकाळाप्रमाणे तुम्ही पुढे जायला हवे पण मागे झाले ते समजून घेऊन.' वेळोवेळी आपल्या या नातवांना त्यानी श्रद्धावान बनवण्यासाठी, भोवती डोळसपणे पाहण्यासाठी, विश्वधर्मावर विश्वास ठेवण्यासाठी, मानवातल्या देवत्वावर श्रद्धा, श्रमावर श्रद्धा ठेवण्याचे आवाहन केले आहे. त्याचे स्वत.चे हे अनुभव पुढील पिढीकरता फार मौल्यवान आहेत.

## डॉ. व. ज. वायंगणकर

एक तत्वचिंतक, कोल्हापूर

गेली काही वर्षे – सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, कौटुबिक इत्यादी जीवनाच्या अनेक क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत, प्रस्थापित मूल्ये ढासळताहेत. विज्ञानाचे शोध– विशेषतः अवकाशातील शोध व तंत्रज्ञानाची प्रगती–स्तिमित करणारी आहे. अण्वस्त्राच्या शोधामुळ तर मानववश नष्ट होतो की काय अशी धोक्याची परिस्थिती निर्माण झाली आहे या व इतर कारणामुळे सद्य.कालीन अनिश्चिततेच, अस्थिरतेचं वातावरण जाणवत आहे. गोंधळलेला मानव हीच समस्या आहे

अशा काळी डॉ. कुलकर्णी यांनी अनेकविध विषय हाताळून जे विचार मांडले आहेत ते पत्ररूपाने जरी नातवंडांना उद्देशून लिहिले असले तरी सर्वांनीच, विशेषतः तरुण पिढीने ते वाचून सखोल विचार आधी स्वत शी करावा व मग इतराशी मनमोकळी चर्चा करावी डॉ. कुलकर्णी याना वाटणारी व्यथा अनेकाची आहे. प्रामाणिक तळमळीन जे विचार त्यानी व्यक्त केले आहेत, त्यावर तरुण पिढीनं विचारप्रवण व्हाव, वैफल्यग्रस्त होऊ नये व ज्यान त्यानं कार्याची दिशा अशी ठरवावी की, ज्यामुळे स्वस्थता लाभेल, उत्साह येईल. ठिकठिकाणी चर्चा मंडळे स्थापावीत. बदलत्या परिस्थितीमुळे आव्हानेही (challenges) बदलत असतात व त्याना तोंड देण्याकरिता मनोवृत्ती अशी लवचिक असावी की त्या त्या वेळी ती बदलत राहील, जीवनाला सामोरी जाईल.

**प्रा.** शरद कुलकर्णी यांनी नातवांना उद्देशून लिहिलेली पत्रे मी वाचली, तेव्हा त्यांचे वेगळेपण माझ्या मनात भरले. नव्या पिढीला पूर्वकालातील सास्कृतिक कल्पना समजणे फार अगत्याचे असते. प्रत्येक माणूस भविष्याची क्षितिजे पहात पुढे चालत असतो खरा, पण भूतकाळाच्या आधारावर आणि वर्तमानातील कर्तृत्वावर त्याचा आत्मविश्वास आधारलेला असतो. पूर्वकाळातील सास्कृतिक दुवे पिढ्यांची नाती जोडत असतात या दुव्याना कर्मकांडांचा गज चढण्याची नेहमीच शक्यता असते. तो दूर करून मूळ कल्पना स्वच्छ होण्यास प्रा. कुलकर्णी याच्या या लेखनाची मोठीच मदत होणार आहे, नुसत्या पौराणिक गोष्टी सागण्यापेक्षा त्याचे जे कालसगत पुनर्प्रतिपादन या लेखात केले आहे ते महत्वाचे आहे.

—शांता किर्लोस्कर

---

## ॥ पूर्णत्वाचे प्रवासी ॥

प्रा. शरद कुलकर्णी

किंमत : रुपये पन्नास

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ
पुणे : ४११ ०३०
फोन : ४४ ३४ ५९

¤

जोशी वाडी, ४१, भवानीशंकर रोड,
चितळे पथ कॉर्नर, दादर,
मुंबई : ४०० ०२८
फोन : ४२२ ५४ ५५

